## बंगालमध्ये नवा वक्फ कायदा लागू होणार नाही

■ वृत्तसंस्था, कोलकाता, दि. ९ :
नवीन वक्फ कायद्याबाबत, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सांगितले की, हा कायदा पश्चिम बंगालमध्ये लागू केला जाणार नाही. त्या म्हणाल्या, सर्व समुदायांना सुरक्षा प्रदान करणे हे आपले कर्तव्य आहे. मी अल्पसंख्याक समुदायांना आवाहन करते की त्यांनी राजकीय चिथावणीला बळी पडू नये.
ममता पुढे म्हणाल्या की, जोपर्यंत ममता दीदी पश्चिम बंगालमध्ये आहेत, तोपर्यंत त्या तुमच्या मालमत्तेचे रक्षण करतील. जर आपण एकत्र असलो तर आपण सर्वकाही जिंकू शकतो आणि जग जिंकू शकतो. चला जगाला हा संदेश देऊया. दुसरीकडे, जम्मू आणि काश्मीर विधानसभेत बुधवारी सलग तिसऱ्या दिवशी नवीन वक्फ कायद्यावरून गोंधळ झाला.

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष १६ * अंक २८४ * * वाशीम * गुरुवार, दिनांक १० एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

**खरीखरी...**

## राज्यपालावर शरसंधान

तामिळनाडूचे राज्यपाल श्रीमान रवी आहेत. रवी म्हणजे सूर्य. पण हा रवी इतका तापला आहे की, त्याच्या ज्वालांमुळे तामिळनाडूच्या द्रमुकने त्यांच्याकडे पाठवलेली विधेयके अगदी मूक बनून गेली होती. सरकार आणि राज्यपाल यांच्यामध्ये जोरदार संवैधानिक संघर्ष सुरू होता. राज्यपाल हा राज्याचा प्रमुख आहे, असे घटना म्हणते. पण हा राज्यपाल दिल्लीत ज्यांचे सरकार सत्तेत आहे त्यांच्याद्वारे नियुक्त होतो. जनतेतून निवडले जातात ते लोकप्रतिनिधी, त्यातून मुख्यमंत्री आणि मंत्री म्हणजेच मंत्रिमंडळ, याच मंत्रिमंडळाने विधानसभेत पारित केलेली विधेयके मंजूर करणे किंवा पुढे विचारार्थ पाठवणे. हे राज्यपालाचे काम असते. त्यांच्या कामाची आठवण देण्याचे प्रसंग काही वर्षांपूर्वी पर्यंत फारसे आलेच नव्हते. राज्यपाल हा पक्षपातीपणा करणारा नसावा, असे म्हटले जाते. तरीही हा पक्षपातीपणा अगदी अट्टहासपूर्वक दिसू नये आणि शक्यतोवर लोकनियुक्त सरकारची विधेयके पदोपदी अडवू नये. असे सर्वसाधारणपणे मानले जाते. ही प्रचलित रीत आजकाल अनेक राज्यपालांनी पाळायचीच नाही. असे ठरवल्यामुळे अनेक बाके प्रसंग उभे ठाकलेले होते. आपल्या महाराष्ट्राचे स्वनामधन्य कोशियारी नावाचे सदगृहस्थ महामहीम होते. हे महामहीम राजभवनात छोटे-मोठे कार्यक्रम अति होशियारीने घेऊन आपले मनोरंजन करून घेत असत. त्यावेळी उद्धव ठाकरे यांचे सरकार होते. त्यांनी पाठवलेली विधेयके किंवा शिफारसी अनेक वेळा आर्किमिडीजच्या सिद्धांताप्रमाणे एखादा घनपदार्थ एखाद्या द्रवात लोंबकळत असतो. त्याप्रमाणे लोंबकळत ठेवल्या. बहुमताच्या सरकारने विधान परिषदेसाठी पाठवलेल्या 12 आमदारांच्या नावाची यादी राजभवनात अक्षरशः कुजून सडून गेलेली होती. पण कोश्शारी यांची हुश्शारी अखेरपर्यंत टिकली. त्यामुळे तेव्हाचे होणारे आमदार काही त्यावेळी आमदार होऊ शकले नाहीत, ते असो. आजचा विषय तामिळनाडूचा आहे. तामिळनाडूच्या रवी नामक राज्यपालाने राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी दहा विधेयके रोखून धरली होती. अखेर तामिळनाडू सरकारने राज्यपाल महोदयांच्या या कृतीचा विरोध करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि आर महादेवन यांच्या खंडपीठाने राज्यपालांना असे काही फटकारले की, त्यांची म्हणजेच सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींची स्तुती जेवढी करावी तेवढी कमीच आहे. त्यांनी एखादे विधेयक किती काळ रोखावे, अशी विचारणा केली. राज्यघटनेच्या कलम 200 नुसार विधेयकावरील निर्णयासाठी कोणतीही कालमयार्दा निश्चित केली गेलेली नाही. पण कालमर्यादा नाही म्हणून राज्यपालांनीही मर्यादा ओलांडू नये. त्या गोष्टींना अमर्यादपणे बांधून ठेवू नये. असे या सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने अधोरेखित केले. त्यानंतर ज्या तारखेला ही विधेयके राज्यपालांकडे पाठवली. त्या तारखेला मंजूर झाली आहेत, असे गृहीत धरावे असा निकाल दिला आहे. यापूर्वीही आपल्या महाराष्ट्राने आणि इथल्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतलेली होती. पण तारखांवर तारखा देऊन चंद्रचूड साहेब निवृत्त झाले तरी त्याचा निकाल लागला नाही. परिपूर्ण निकाल न लावता गोलमोल निकाल लावणे. हे महाराष्ट्राच्या सरकार बाबत चंद्रचूड साहेबांनी दिलेल्या निर्णयाचे हे मोठेच उदाहरण होते. तामिळनाडू सरकारची अनेक विधेयके राज्यपालांची पंखे कापणारीच होती. हे मान्य करूनही सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडू सरकारच्या विधेयकांना 'पारित झाले' असे घोषित केले. ही फार मोठी घटना आहे. त्यापुढे जाऊन सर्वोच्च न्यायालयाने कोणत्याही विधेयकावर एका महिन्याच्या आत निर्णय घ्यावा, असे आदेश दिलेले आहेत. राज्यपालांनी संबंधित विधेयक परत पाठवले आणि राज्याच्या विधी मंडळाने दुसऱ्यांदा मंजूर देऊन पाठवले असेल. तर ते विधेयक राज्यपालांनी एका महिन्याच्या आत मंजूर करावे. असा आदेशच दिला. जर राज्यपालांनी असे केले नाही. तर त्यांची किंवा त्यांच्या निर्णयाची न्यायिक समीक्षा केली जाईल, असेही सर्वोच्च न्यायालय म्हणते. हा निर्णय म्हणजे राज्यपाल पदावरील म्हणजे अगदी महामहीम असलेल्या त्या व्यक्तीसाठी सर्वोच्च न्यायालयाचा हा महाआदेश आहे. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. राज्यपाल पदावरील व्यक्ती पक्षनिरपेक्ष नसली. तरी त्याने पक्षसापेक्ष असू नये. एवढे भान राखले तरी त्यांच्यावर रवी साहेबांसारखी पाळी येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने कान टोचल्यामुळे आता इतर राज्यातही त्याचा फायदा त्या त्या राज्यांच्या सरकारांना होणार आहे. ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने देशाच्या राजकारणात समाधानाच्या वार्ता येत आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या ज्या न्यायमूर्तींनी अतिशय निरपेक्षपणे हा निर्णय दिला आहे. त्यांना देशातील सुजाण जनता धन्यवाद देईल. यात अजिबात शंका नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# वक्फ सुधारणा विधेयक हा संविधानावर हल्ला!

■ वृत्तसंस्था
**अहमदाबाद, दि. ९ :**
काँग्रेसचे ८४ वे अधिवेशन गुजरातमधील अहमदाबाद येथे संपन्न झाले. अधिवेशनात राहुल गांधी म्हणाले, काही दिवसांपूर्वी भाजपने लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर केले. हा धार्मिक स्वातंत्र्य आणि संविधानावर हल्ला आहे. आरएसएसच्या मुखपत्र ऑर्गनायझरमध्ये लिहिले आहे की ख्रिश्चनांवर हल्ला होणार आहे. हे धर्मविरोधी विधेयक आहे. देशातील प्रत्येक व्यक्तीला हे माहित असले पाहिजे.



बांगलादेश भारताविरुद्ध विधाने करत आहे. भारताचे पंतप्रधान तिथे त्या नेत्यांना भेटले. त्यांच्या तोंडातून एकही शब्द बाहेर पडला नाही. तुमची ५६ इंचाची छाती कुठे गेली? असा सवाल त्यांनी केला. मंगळवारी, पहिल्या दिवशी, काँग्रेस कार्यकारिणी समितीची बैठक चार तास चालली. आज, दुसऱ्या दिवशी, मुख्य अधिवेशन साबरमती रिव्हरफ्रंट येथे झाले, ज्यामध्ये देशभरातील १७०० हून अधिक काँग्रेस कमिटीचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी आणि राहुल अधिवेशनात उपस्थित होते, परंतु प्रियंका गांधी आल्या नाहीत.

सत्राच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. आपल्या भाषणात राहुल म्हणाले, आमच्या संघटनेत अनेक बैठका झाल्या आहेत. आम्हाला जिल्हाध्यक्षांनी संघटनेचा पाया रचावा आणि ती त्यांची ताकद बनवावी अशी आमची इच्छा आहे. आम्ही जिल्हा समिती आणि जिल्हाध्यक्षांना पक्षाचा पाया बनवणार आहोत. तुम्हा सर्वांना लढावे लागेल. हे सोपे नाही. त्यांच्याकडे पैसा आहे आणि देशातील सर्व संस्था आहेत. त्यांच्याकडे सर्व काही आहे, पण विजय आपलाच होईल, जनतेचे प्रेम आपल्यासोबत आहे. येणाऱ्या काळात जनता त्यांचे काय करणार आहे ते तुम्हाला दिसेल.

तुमच्यासाठी, दलित असो, आदिवासी असो, मागास असो, महिला असो किंवा इतर कोणीही असो, तुम्ही सर्वांचा आदर करता. त्याचे हृदय सर्वांबद्दल द्वेषाने भरलेले आहे. हा संघर्ष याच विषयावर आहे. आपल्यासाठी सर्व लोक मानव आहेत. आम्हाला सर्वांवर प्रेम आहे. त्यांच्यासाठी आदराचा वेगळा अर्थ आहे.

जर कोणी दलित असेल तर त्याने मंदिरात जाऊ नये. दलितांनी मंदिरात जाऊ नये. जर कोणी गरीब शेतकऱ्याचा मुलगा असेल तर त्याने इंग्रजी शिकू नये. आम्ही हे होऊ देणार नाही, अशा शब्दात ठणकावत त्यांनी आरएसएसवर सुद्धा सडकून टीका केली.

## उच्चस्तरीय चौकशी समितीचा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द

### मंगेशकर रुग्णालयाच्या अडचणी वाढल्या




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
गरोदर महिलेच्या मृत्यूनंतर अडचणीत सापडलेल्या पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या अडचणी आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या घटनेची चौकशी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीने आपला अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द केला आहे. या अहवालात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर ठपका ठेवण्यात आला आहे. या प्रकरणात मंगेशकर रुग्णालयाला दोषी ठरवण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता रुग्णालयावर काय कारवाई होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थापन केलेल्या समितीचा अहवाल सादर झाला असून यामध्ये रुग्णालयावर ठपका ठेवण्यात आला आहे. वास्तविक या प्रकरणात तनिषा भिसे यांच्यावर रुग्णालयाने तातडीने उपचार करण्याची जबाबदारी होती. मात्र या प्रकरणात भिसे यांच्या कुटुंबाकडे पैशाची मागणी करण्यात आली, त्यांना डिपॉझिट जमा करण्याचे सांगण्यात आले होते. रुग्णालयाच्या वतीने देखील ते मान्य करण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणात आता रुग्णालयाला दोषी ठरवण्यात आले आहे. हा अहवाल आल्यानंतर आता रुग्णालयावर काय कारवाई होणार, हे पाहावे लागेल.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालय संदर्भात पुणे पोलिसांनी देखील मोठे पाऊल उचलले आहे. आता या रुग्णालय परिसरात आंदोलनास बंदी घालण्यात आली आहे. रुग्णालयाच्या 100 मीटर परिसरात हे निर्बंध लागू असणार आहेत. रुग्णालय परिसरात रुग्णांच्या नातेवाइकांशिवाय इतर सामान्य व्यक्तींना एकत्र जमण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे.

**महापालिकेची नोटीस**

या रुग्णालयाने पुणे महापालिकेचा तब्बल 27 कोटींचा मिळकत कर थकवला आहे. सुमारे सहा वर्षांपासून हा कर थकवल्याची माहिती आहे. या प्रकरणी पुणे महानगरपालिकेने या रुग्णालयाला जप्तीची नोटीस पाठवली आहे. मिळकत कराचे 22 कोटी रुपये दोन दिवसांत जमा करावी अन्यथा पुढील कारवाई केली जाईल, असा इशारा महापालिकेने दिला आहे. ही नोटीस लता मंगेशकर मेडिकल फाउंडेशनच्या नावाने जारी केली गेली आहे.

## महाराष्ट्राची निवडणूक एक मोठा 'फ्रॉड'

### खरगे यांचा मोठा आरोप

■ वृत्तसंस्था
**अहमदाबाद, दि. ९ :**
भाजपने मतदार यादीत घोळ करून महाराष्ट्र विधानसभा निवडणूक जिंकल्याचा गंभीर आरोप काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी बुधवारी केला.



लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या सर्वाधिक जागा आल्या. पण त्यानंतर भाजपने मतदार यादीत फेरफार करून तब्बल 50 लाख मतदार वाढवले. त्यानंतर भाजपच्या विधानसभा निवडणुकीत 150 पैकी 138 जागा निवडून आल्या. आता तुम्हीच सांगा ही कशी लोकशाही? हा कसा निवडणूक आयोग? ही कोणती मतदार यादी या लोकांनी तयार केली? सर्वकाही बोगस तयार करून हे जिंकले, असे खरगे यांनी म्हटले आहे.

मल्लिकार्जुन खरगे नेत्यांना व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना उपरोक्त आरोप केला. ते म्हणाले, केंद्र सरकार स्वतःला फायदा व विरोधी पक्षांना नुकसान व्हावे या दृष्टिकोनातून तंत्रज्ञान तयार करत आहे. पण आज नाही तर उद्या या देशातील तरुण जागे होऊन तुमचा हात पकडून आम्हाला ईव्हीएम नव्हे तर बॅलेट पेपरवर मतदान हवे असल्याचे ठणकावून सांगतील.

## वाळूचे अवैध उत्खनन-साठेबाजी एसडीओ, तहसीलदार निलंबित

■ **महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ९ :**
जिल्ह्यातील तुमसर उपविभागात अवैध वाळू उत्खनन आणि साठेबाजीला आळा घालण्यात अपयशी ठरलेल्या दोन महसूल अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तुमसरचे उपविभागीय अधिकारी (एसडीओ) दर्शन निकाळजे आणि तहसीलदार मोहन टिकले यांना तात्काळ निलंबित केले आहे. नागपूरच्या विभागीय महसूल आयुक्तांनी केलेल्या चौकशीत हे दोन्ही अधिकारी भ्रष्टाचारात सामील असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

भंडारा जिल्ह्यातील अवैध वाळू उत्खनन रोखणे, संबंधित आरोपींवर कारवाई करणे आणि अवैध वाळू वाहतुकीच्या अपघातात जखमी झालेल्यांना नुकसानभरपाई मिळवून देण्याबाबत विधानसभेत लक्षवेधी उपस्थित करण्यात आली होती.

या चर्चेदरम्यान महसूलमंत्री बावनकुळे यांनी सात दिवसांत विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांनी तातडीने निलंबनाचे आदेश जारी केले. चौकशीत असे आढळून आले की, तुमसर भागात गौण खनिज प्रकरणात पर्यावरण विभागाची परवानगी नसताना वाळू घाटांतून बेकायदेशीर उत्खनन झाले होते. हा प्रकार गंभीर असल्याचे मानून निलंबनाची कारवाई करण्यात आली.

महसूलमंत्री बावनकुळे यांनी याप्रकरणी कठोर भूमिका घेत अधिकाऱ्यांना इशारा दिला आहे. ते म्हणाले, "अवैध वाळू उत्खनन आणि साठेबाजी हा अत्यंत गंभीर गुन्हा आहे. सामान्य नागरिकांच्या हक्काच्या वाळूवर बेकायदेशीरपणे डल्ला मारण्याचा प्रयत्न महाराष्ट्रात कुठेही होणार नाही. जिथे असा प्रकार आढळेल, तिथे कठोर कारवाई केली जाईल. राज्यभरातील महसूल अधिकाऱ्यांनी सतर्क राहून या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे."

या कारवाईमुळे भंडारा जिल्ह्यातील अवैध वाळू माफियांवर अंकुश बसण्याची शक्यता आहे. तसेच, प्रशासनातील भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार गंभीर असल्याचे संकेत मिळाले आहेत.

## आरोग्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने 'मिशन'

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ९ :**
राज्यातील आरोग्य उपकेंद्रांपासून ते संदर्भ सेवा रुग्णालयांपर्यंतच्या विविध आरोग्य संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी विस्तृत प्रकल्प तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

हा प्रकल्प आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने 'मिशन' स्वरूपात राबवावा, अशा सूचनाही त्यांनी केल्या. सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, केंद्र सरकारने राष्ट्रीय कर्करोग उपचार धोरण आणले आहे. त्याच धर्तीवर राज्यात कर्करोग निदान आणि उपचारांसाठी प्रभावी कार्यपद्धती ठरविण्यात यावी. यात केमोथेरपी, रेडिएशन थेरपी यांचा समावेश असावा आणि उपचारांसाठी विहित कालमर्यादा निश्चित करावी. नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य विभागाने नाविन्यपूर्ण उपायांचा अवलंब करावा.

राज्यात नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरू होत असून, त्यांना संलग्न रुग्णालये जोडण्यात आली आहेत. ज्या ठिकाणी लोकसंख्या आणि रुग्णसंख्या जास्त आहे, तिथे स्वतंत्र रुग्णालये उभारण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

फडणवीस पुढे म्हणाले, "ज्या जिल्ह्यांत शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरू झाली आहेत, तिथे वैद्यकीय शिक्षण विभागाचे स्वतंत्र रुग्णालय आवश्यक आहे का, याची पडताळणी करावी. रुग्णालयांची गरज आणि नवीन रुग्णालय उभारणी आवश्यक असलेल्या ठिकाणांचे वर्गीकरण करून विस्तृत नियोजन आराखडा तयार करावा. वैद्यकीय विद्यार्थ्यांना शिक्षणानंतर ठराविक कालावधीसाठी शासकीय रुग्णालयात सेवा देणे बंधनकारक करण्याबाबतही पडताळणी करावी.

## करुणा व धनंजय मुंडे यांचे संबंध लग्नासारखेच

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
मुंबई सत्र न्यायालयाने राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांना करुणा शर्मा यांना पोटगी देण्याचे आदेश दिलेत. कोर्टाने या प्रकरणी मुंडे यांनी दंडाधिकारी कोर्टाच्या आदेशांना दिलेली आव्हान याचिका फेटाळून लावली.

करुणा व धनंजय मुंडे यांच्यातील संबंध हे लग्नासारखेच आहेत. या दोघांनी 2 मुलांना जन्म दिला. हे एकाच घरात राहिल्याशिवाय शक्य नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण कोर्टाने यासंबंधी नोंदवले आहे.



मुंबईतील वांद्रे दंडाधिकारी न्यायालयाने गत 4 फेब्रुवारी रोजी धनंजय मुंडे यांना करुणा शर्मा यांना दरमहा 2 लाख रुपयांची पोटगी देण्याचे आदेश दिले होते.

## ईयुने अमेरिकेवर लावला २५% टॅरिफ

■ **वृत्तसंस्था, वॉशिंग्टन डीसी, दि. ९ :**
युरोपियन युनियनने (ईयु) बुधवारी अनेक अमेरिकन उत्पादनांवर २५% पर्यंतचे कर लादण्यास मान्यता दिली, जे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कर लादण्याला प्रत्युत्तर देत आहे. याद्वारे युरोपियन युनियन अमेरिकेवर करार करण्यासाठी दबाव आणू इच्छिते.
वॉशिंग्टन पोस्टच्या अहवालानुसार, सोयाबीन, मांस, अंडी, बदाम, लोखंड, स्टील, कापड, तंबाखू आणि आईस्क्रीमसह अनेक अमेरिकन उत्पादनांना ईयू यादीत लक्ष्य करण्यात आले आहे.
दुसरीकडे, अमेरिकेने लादलेल्या १०४% टॅरिफला प्रत्युत्तर म्हणून चीननेही अमेरिकेवर ८४% टॅरिफ लादला आहे. हे दर उद्यापासून लागू होतील. यापूर्वी चीनने अमेरिकन वस्तूंवर ३४% कर लादला होता.




## प्रशांत कोरटकरला अखेर जामीन

■ वृत्तसंस्था
**कोल्हापूर, दि. ९ :**
इंद्रजित सावंत यांना धमकी दिल्या प्रकरणी तथा छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी अवमानकारक भाष्य केल्याप्रकरणी गत महिन्याभरापासून तुरुंगात असणाऱ्या प्रशांत कोरटकरला आज अखेर जामीन मंजूर करण्यात आला. कोल्हापूर जिल्हा व सत्र न्यायालयाने त्याला हा दिलासा दिला आहे.



## तहव्वुर राणाचे ठीक.. मात्र, दाऊदचे काय?

### नाना पटोलेंचा सवाल
### खा. प्रणिती शिंदे यांचीही टीका

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ९ :**
काँग्रेसच्या अहमदाबाद येथील अधिवेशनात महाराष्ट्रातील नेत्यांचाही समावेश आहे. या अधिवेशनासाठी उपस्थित असलेले काँग्रेस आमदार नाना पटोले आणि खासदार प्रणिती शिंदे यांनी भाजपवर निशाणा साधला आहे.



26/11 च्या मुंबई हल्ल्यातील आरोपी तहव्वूर राणाला भारतात प्रत्यार्पित करण्यात येणार आहे. या बाबत काँग्रेस नेते नाना पटोले म्हणाले की, "अशा लोकांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. जोपर्यंत त्याला येथे आणले जात नाही तोपर्यंत आपण कशावर विश्वास ठेवू शकतो? वास्तविक नरेंद्र मोदी यांनी दाऊद इब्राहिमला भारतात परत आणणार अशी घोषणा केली होती. त्याचे काय झाले? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.

काँग्रेस पक्षाचे कोणतेही राजकीय नुकसान झाल्यास त्यावर उहउ बैठकीत चर्चा केली जाते. कमतरता दूर करण्यासाठी निर्णय घेतले जातात. काँग्रेसमध्ये लोकशाही आहे. तिथे (भाजपमध्ये) लोकशाही नाही, मोदी आणि अमित शहा जे काही बोलतात तो भाजपचा निर्णय असतो, अशा शब्दात पटोले यांनी निशाणा साधला.

लोकसभा खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, सत्तेत आल्यापासून भाजपचा अजेंडा ध्रुवीकरणाचा आहे. महाराष्ट्रात ते 300 वर्षे जुने मुद्दे उपस्थित करत आहेत. महागाई, पेट्रोल आणि डिझेलच्या किमती, मणिपूर, बेरोजगारी किंवा शेतकऱ्यांबद्दल कोणीही बोलत नाही. एक प्रकारे, भाजप देशाचे विभाजन करण्याचे काम करत आहे आणि विष पसरवत असल्याचा आरोप शिंदे यांनी केला आहे.

## गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट दोघांचा होरपळून मृत्यू



■ **पुणे :** पुण्यात वारजे येथील माळवाडी येथे गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट झाला आहे. माळवाडी येथील सर्वे नंबर 52 गोकुळ नगर येथे एका पत्र्याच्या घरात मंगळवारी मध्यरात्री हा भीषण स्फोट झाला असून यात दोघांचा होरपळून मृत्यू झाला.

गॅस सिलिंडर स्फोटाची माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. या भीषण स्फोटामुळे आगीने रौद्ररूप धरण केले होते. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत ही आग आटोक्यात आणली. यावेळी घरात दोन पुरुष जखमी अवस्थेत आढळून आले असता त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान या दोघांचा मृत्यू झाला. मोहन माणिक चव्हाण (43) आणि आतिश मोहन चव्हाण (25) अशी मृतांची नावे आहेत.

पत्र्याच्या घरात झालेल्या या गॅस सिलिंडर स्फोटाची भीषणता इतकी भयानक होती की या स्फोटात सिलिंडरचे जवळपास पाच ते सहा तुकडे झाले होते. इतकेच नव्हे तर सिलिंडरच्या वरील भागातील रिंगही वेगळी होऊन पडली होती. घरातील सामानांची राखरांगोळी झालेली दिसली. घर पत्र्याचे असल्याने संपूर्ण घरच या स्फोटात उद्ध्वस्त झाले आहे.

## बनेश्वर रस्त्यासाठी सुप्रिया सुळेंचे आंदोलन

**पुणे :** भोर तालुक्यातील रस्त्यासंदर्भात शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. श्रीक्षेत्र बनेश्वर येथील रस्त्याची दुर्दशा झाली आहे, तो लवकरात लवकर करावा ह्या मागणीसह सरकारी अनास्थेचा निषेध करण्यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांनी धरणे आंदोलन केले.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, बनेश्वर देवस्थानाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम अजून झालेले नाही हे खूप दुर्दैवी आहे. ज्या शहरामध्ये करोडो रुपयांची मेट्रो होऊ शकते, करोडो रुपयांचे रस्ते नितीन गडकरी यांच्या नेतृत्वात देशभरात होत आहे. बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये सर्व टीमच्या पाठपुराव्यामुळे सर्वच रस्ते झाले आहेत. बनेश्वर हे अस्थेचे ठिकाण आहे. दीड किमीचा हा रस्ता होत नाही, हे दुर्दैव आहे. गेले 6 महिने आम्ही यासाठी सरकारकडे पाठपुरावा करत आहोत, किमान दुरुस्ती करावी अशी आमची मागणी आहे, पण सरकारकडून मोठा प्रोजेक्ट आहे असे सांगितले जाते पण हा प्लॅन आमच्या पदरात कधी पडणार असा सवाल सुप्रिया सुळेंनी केला आहे.

बनेश्वर देवस्थानचे विश्वस्त म्हणाले की, आमची केवळ एकच मागणी आहे. आमचा रस्ता लवकरात लवकर झाला पाहिजे. आम्ही निवेदन देऊनही रस्ता झालेला नाही. तरी तो रस्ता जितक्या लवकर करता येईल तो करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## 'मुद्रा योजने'ची दशकपूर्ती कौतुकास्पद



**पुणे :** आंतरराष्ट्रीय दर्जा आणि मानके पूर्ण करणारी एक भक्कम आर्थिक प्रणाली उभारण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सदैव प्रयत्नरत असतात. सामाजिक समरसतेचे ध्येय समोर ठेवून समाजातील सर्वात खालच्या स्तरातील लोकांना आर्थिक, सामाजिकदृष्ट्या प्रगती करण्याची संधी देण्यासाठी केंद्र सरकार राबवत असलेल्या 'प्रधानमंत्री मुद्रा योजने'ला १० वर्ष पूर्ण झाली आहे. ही योजना देशाचा आर्थिक कणा मजबूत करणारी आहे, असे मत इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी व्यक्त केले.

विशेष म्हणजे दशकभरात ३३ लाख कोटींहून अधिक ५२ कोटींपेक्षा जास्त तारणविरहित कर्जे सरकारने लाभार्थ्यांना दिली आहेत. कौतुकास्पद बाब म्हणजे यातील ७०% कर्ज केवळ महिलांना, तर ५०% कर्जे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच इतर मागासवर्गीयांना देत सरकारने त्यांना आर्थिक सक्षम केले.ही बाब वंचित घटकांच्या विकासाकरीता मोदी सरकारची कटिबद्धता दाखवून देणारी असल्याचे पाटील म्हणाले.

रोजगार निर्मितीत देखील योजनेची कामगिरी विशेष उल्लेखनिय आहे.योजना सुरू झाल्याच्या पहिल्या तीन वर्षांत १ कोटींपेक्षा जास्तीचे रोजगार निर्माण करण्यात सरकारला यश मिळाले. बिहार सारखे राज्य योजनेत आघाडीवर आहे.पहिल्यांदा उद्योग सुरू करणा?यांचे सक्षमीकरण करण्यासाठी १० लाख कोटींची तरतूद सरकारने केली.मदतीचा हा ओघ भविष्यातही सुरू राहील.विशेष म्हणजे लहान व्यवसायांसोबत निमशहरी आणि ग्रामीण भागातील सामान्य लोकांसाठी स्वयंरोजगार, स्वावलंबनाचा स्त्रोत सरकारने योजनेच्या यशस्वी अंमलबजावणी करीत उभारला आहे, असा दावा देखील पाटील यांनी केला.

## गोदावरी नदी स्वच्छतेसाठी मनसेचे आंदोलन

**नाशिक :** गोदावरी नदीच्या वाढत्या प्रदूषणावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) आक्रमक झाली असून, बुधवारी नाशिकमध्ये पक्षाने आंदोलन छेडले. मनसेचे कार्यकर्ते पंचवटीतील रामकुंड परिसरात गोदावरी नदीपात्रात उतरले आणि पानवेली घेऊन नदी स्वच्छतेची मागणी केली. या आंदोलनाद्वारे नदीचे पावित्र्य जपले जावे आणि प्रदूषणमुक्त करण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, असा संदेश मनसेने दिला. मनसेचे सरचिटणीस दिनकर पाटील यांनी या आंदोलनाची घोषणा करताना सांगितले की, गोदावरीसह राज्यातील नद्या प्रदूषणमुक्त व्हाव्यात, यासाठी पक्ष आता हा मुद्दा हाती घेणार आहे. रामकुंडात मनसैनिकांनी नदीत उड्या मारून लक्ष वेधले.

# मनसेला टार्गेट करण्यामागे 'महाशक्ती' ?

### शरद पवार गटाने व्यक्त केली शंका : दोन पक्ष फोडल्याचा दाखला देत राज ठाकरेंना सतर्कतेचा इशारा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** महाराष्ट्रात मराठी माणसांनी स्थापन केलेले दोन राजकीय पक्ष फोडण्यात आलेत. त्यामुळे मनसेला टार्गेट करणाऱ्यांमागे 'महाशक्ती' तर नाही हे तपासून घ्यायला हवे, अशी शंका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना सतर्कतेचा इशाराही दिला आहे.



राज ठाकरे यांनी मनसेच्या गुढीपाडव्याच्या मेळाव्यात आपल्या कार्यकर्त्यांना मराठीचा मुद्दा लावून धरण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर मनसैनिकांनी विविध बँकांमध्ये जाऊन तेथील कामकाज मराठीत करण्याचा आग्रह धरला होता. यामुळे अनेक ठिकाणी मराठी - अमराठी वाद उफाळून आला होता. त्यानंतर राज ठाकरे हे हिंदूविरोधी असल्याचा दावा करत उत्तर भारतीय विकास सेनेने मनसेची मान्यता रद्द करण्याची याचिका सुप्रीम कोर्टात दाखल केली. या पार्श्वभूमीवर रोहिणी खडसे यांनी या प्रकरणामागे महाशक्ती असल्याचा संशय व्यक्त केला आहे.

रोहिणी खडसे आपल्या ट्विटमध्ये म्हणाल्या की, कालपासून मनसेची मान्यता रद्द करण्याची मागणी केली जात आहे, पक्षाला विविध इशारा दिले जात आहेत, त्यांच्या पदाधिकाऱ्यांना टार्गेट केले जात आहे. बंधू राज साहेब, मराठी पक्षांचे, मराठी उद्योजकांचे, मराठी भाषेचे किंबहुना महाराष्ट्र आणि मराठी माणसांचे काही पक्षांना वावडे आहे. कारण याआधीही मराठी माणसांनी बनवलेले दोन मराठी पक्ष फोडण्यात आले आहेत. तुम्ही एकदा तपासून घ्यावे मनसेला टार्गेट करणाऱ्यांच्या मागे कदाचित महाशक्ती तर नाही!

दुसरीकडे, मनसे नेते संदीप देशपांडे यांनी या प्रकरणी भाजपवर टीकेची झोड उठवली आहे. मनसेची मान्यता रद्द करावी म्हणून कुठला तरी भय्या म्हणे कोर्टात गेला आहे. मराठी माणसाचा पक्ष बंद व्हावा म्हणून भय्ये प्रयत्न करणार असतील, तर भय्यांना मुंबईत, महाराष्ट्रात राहू द्यायचे का यावर विचार करावा लागेल. आमचा पक्ष राहावा की राहू नये हे आता भय्ये ठरवणार का? त्या याचिकेमागील षड्यंत्र तुम्ही लक्षात घ्या. हे सगळे प्रादेशिक पक्षांना संपवण्याचे षड्यंत्र आहे. हे भाजपाचे षड्यंत्र आहे. हे लोक भाजपाचेच पिट्टू आहेत. भाजपावाले यांच्या माध्यमातून आमच्या पक्षाला नख लावण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र आम्ही अशा गोष्टींना घाबरत नाही असे त्यांनी म्हटले आहे.

मनसेने ट्विटद्वारे मेट्रो स्थानकांची नावे मराठीत करण्याचा आग्रह धरला आहे. मुंबईत नव्याने जी मेट्रो रेल्वेच्या मेट्रो ३ चा जो नवीन टप्पा सुरु होत आहे, त्यातील मेट्रो स्थानकांची नावं इंग्रजीत का? महाराष्ट्रामध्ये स्थानकांची नावं इंग्रजीसोबत मराठीत ठळक स्वरूपात असायला हवी इतका साधा नियम महा मुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेडच्या लक्षात आला नाही का? असा सवाल मनसेने उपस्थित केला आहे.

**घरात घुसून मारू...**

मुंबईत मराठी व अमराठी वाद पेटला आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या विरोधात तसेच महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाची मान्यता रद्द करण्यासाठी याचिका हायकोर्टात दाखल करण्यात आली आहे. मनसे नेते व मुंबई शहराध्यक्ष संदीप देशपांडे यांना धमकीचा कॉल आला आहे.



तुम्हाला घरात घुसून मारू, अशी धमकी त्यांना देण्यात आली आहे. संदीप देशपांडे यांनी याबाबत पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणी बोलताना संदीप देशपांडे म्हणाले, रात्री सव्वा दहा वाजता मला अज्ञात नंबरवरून फोन आला. फोनवर फक्त शिव्या घालत होता. त्यानंतर पुन्हा फोन केला तेव्हा मी कॉल रेकॉर्ड केला. तुम्हाला घरी येऊन मारू वैगेरे धमकी देत होता. असल्या धमक्यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेना घाबरत नाही. मी पोलिस तक्रार केली आहे.

**राज ठाकरे हिंदूविरोधी**

उत्तर भारतीय विकास सेनेचे सुनील शुक्ला यांनी राज ठाकरे यांच्यावर टीका केली होती. ते म्हणाले, जर महाराष्ट्रात भविष्यात गजवा ए हिंद झाले तर मराठी लोकांना वाचवण्यासाठी माझा उत्तर भारतीय उभा राहायला हवा की नको? असा सवाल त्यांनी केला होता.

# २२ कोटी भरा अन्यथा जप्तीची कारवाई

### दीनानाथ रुग्णालयाच्या अडचणीत वाढ

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ९ :** पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या अडचणीत वाढ झाली आहे. तनिषा भिसे या गर्भवती महिलेला 10 लाखांसाठी उपचार नाकारणाऱ्या या रुग्णालयाने पुणे महापालिकेचा तब्बल 27 कोटींचा मिळकत कर सुमारे सहा वर्षांपासून थकवला आहे.

या प्रकरणी पुणे महानगरपालिकेने या रुग्णालयाला जप्तीची नोटीस पाठवली आहे. मिळकत कराचे 22 कोटी रुपये दोन दिवसांत जमा करावी अन्यथा पुढील कारवाई केली जाईल, असा इशारा महापालिकेने दिला आहे. ही नोटीस लता मंगेशकर मेडिकल फाउंडेशनच्या नावाने जारी केली गेली आहे.

पुण्यातील नामांकित दीनानाथ मंगेशकर रुग्णालय तनिषा भिसे मृत्यू प्रकरणी वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. तनिषा भिसे या गर्भवती महिलेला 10 लाखांसाठी उपचार नाकारल्याने तिच्या मृत्यूस रुग्णालय कारणीभूत ठरल्याचा आरोप केला जात आहे. महापालिकेने मिळकत कर वसूल न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा सुप्रिया सुळे आणि युवक कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रोहन सुरवसे पाटील यांनी दिला होता. आता महापालिकेने रुग्णालयाला दणका देत थकीत 22 कोटी रुपये कर भरण्यास सांगितले आहे.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाकडील थकबाकीबाबत अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत पृथ्वीराज बी. पी यांनी थकबाकी न भरणाऱ्या या मिळकतीवर नियम 42 च्या तरतुदीनुसार जप्तीची कारवाई करण्याचे तोंडी आदेश दिले आहेत. त्यानुसार महापालिकेच्या मिळकतकर विभागाने लता मंगेशकर मेडिकल फाउंडेशनला नोटीस बजावली आहे.

दरम्यान, रुग्णालयाचा महापालिकेचा कर कोर्टाच्या अधीन असल्याचे तसेच आमचा एकही रुपयाचा कर थकलेला नाही आणि थकूच शकत नाही, असे दीनानाथ रुग्णालयाचे अधिष्ठाता धनंजय केळकर म्हणाले होते. मात्र, आता नोटिसीमुळे केळकर हे तोंडघशी पडले आहेत.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी निमित्त चर्चगेट स्थानकाजवळील त्यांच्या पुतळ्याचे आणि परिसराचे सुशोभीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या पुतळ्याची दुरुस्ती तसेच परिसरात त्यांच्या कार्याचा आकर्षक देखावा साकारण्याचे नियोजन आहे. महेश्वर येथील राजवाडा, इंदोर येथील वास्तूशिल्प, काशीविश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार आणि वृक्षसंवर्धन यासारख्या त्यांच्या ऐतिहासिक योगदानाला प्रकाश योजना आणि कलात्मक स्वरूपात उजागर केले जाणार आहे.

विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला मुंबई महानगरपालिकेचे सहायक आयुक्त जयदीप मोरे, डॉ. असिम गोकर्ण हरवंश आणि इतर अधिकारी उपस्थित होते. या प्रकल्पाचे काम १५ मे, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश प्रा. शिंदे यांनी दिले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती ३१ मे, २०२५ रोजी असून, या निमित्ताने हा पुतळा सुशोभीत आणि पुष्पमंडित स्वरूपात सादर करण्यात येणार आहे.

अहिल्यादेवी होळकर यांचे सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. पुतळ्याच्या पाठीमागील भिंतीवर त्यांच्या कार्याचा इतिहास आकर्षक पद्धतीने मांडला जाईल. यामुळे पर्यटकांना त्यांच्या कर्तृत्वाची माहिती होईल.

## नवीन हकश्राव्य संकुलाचे स्वरगंधर्व सुधीर फडके नामकरण

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :** पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या नूतनीकृत संकुलात नव्याने साकारण्यात आलेल्या ध्वनीमुद्रण व ध्वनिरोपण कक्ष, आभासी चित्रीकरण कक्ष, संकलन कक्ष आणि प्रशिक्षण दालन या संकुलाचे नामकरण "स्वरगंधर्व सुधीर फडके हक-श्राव्य संकुल" असे करण्यात आले आहे.



बुधवार, ९ एप्रिल २०२५ रोजी संगीतकार श्रीधर फडके यांच्या हस्ते या संकुलाचे लोकार्पण झाले. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

या कार्यक्रमाला सांस्कृतिक विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे, अकादमीच्या संचालिका मिनल जोगळेकर, दिग्दर्शक कुमार सोहनी, पुरुषोत्तम बेर्डे, गायिका उत्तरा केळकर, राणी वर्मा, उपेंद्र भट यांच्यासह कला क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी सुधीर फडके यांच्या अजरामर गीतांचा कार्यक्रम सादर झाला. श्रीधर फडके यांनी स्वतः बापूजींनी संगीतबद्ध केलेले गाणे गायले, तर केतकी भावे जोशी, अभिषेक नलावडे, सोनाली कर्णिक, प्रशांत लळीत, कुणाल रेगे आणि अजित परब यांनी निवडक गाणी सादर करून वातावरण भारून टाकले.

सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार म्हणाले, "सुधीर फडके यांच्या स्मृती जपण्याचे काम शासनाने केले याचा आनंद आहे. संकुलाला नाव देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा झाली. त्यांनीच सुधीर फडके यांचे नाव सुचवले आणि हा निर्णय घेतला गेला.

हे संकुल सर्वांसाठी कमी शुल्कात खुले असेल." त्यांनी मराठी शाळांमधील आपल्या अनुभवाचा उल्लेख करत, "आम्ही बापूजींची गाणी प्रार्थना म्हणून गायलो. आज मराठीसाठी आंदोलन करणाऱ्यांची किती मुले मराठी शाळेत शिकतात, हे माहिती नाही," असा टोलाही लगावला. कार्यक्रमात विकास खारगे यांनी सादर केलेले बासरी वादन विशेष आकर्षण ठरले. हे संकुल मराठी कला आणि संगीत क्षेत्राला नवी दिशा देणारे ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. याप्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते.

## अजित दादांचे मंत्री कोकाटे यांना खडेबोल

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पक्षाचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना खडेबोल सुनावले आहेत.



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दर मंगळवारी अजित पवार यांच्या देवगिरी या शासकीय निवासस्थानी पक्षाच्या मंत्र्यांची आणि आमदारांची बैठक आयोजित केली जाते. या बैठकीला माणिकराव कोकाटे तब्बल अर्धा तास उशिरा पोहोचले, ज्यामुळे अजित पवार यांनी त्यांना कडक शब्दांत तंबी दिली. पक्षाला अडचणीत आणणारी वक्तव्ये टाळण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

ही बैठक पक्षाच्या धोरणांवर चर्चा आणि कार्यकर्त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी नियमितपणे घेतली जाते. मात्र, या बैठकीत कोकाटे यांच्या उशिरा येण्याने आणि त्यांच्या अलीकडील वादग्रस्त वक्तव्यांमुळे अजित पवार नाराज झाले. सूत्रांच्या माहितीनुसार, कोकाटे यांनी शेतकरी कर्जमाफीवर केलेल्या एका विधानामुळे विरोधकांना टीकेचे आयते कोलीत मिळाले होते.

या विधानाने पक्षाची प्रतिमा मलिन होण्याची शक्यता निर्माण झाली होती. अजित पवार यांनी यावर स्पष्टपणे नाराजी व्यक्त करत, "बोलताना जरा विचार करा, पक्षाला अडचणीत आणणारी वक्तव्ये करू नका," असे बजावले. पक्षातील शिस्त आणि एकजुटीवर भर देणारे अजित पवार यांनी यापूर्वीही अशा घटनांवर कठोर भूमिका घेतल्याचे दिसून आले आहे. कोकाटे यांच्या वक्तव्यांमुळे निर्माण झालेल्या वादानंतर आता पक्षांतर्गत संवाद आणि जबाबदारीवर अधिक लक्ष दिले जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत. या बैठकीत अन्य आमदारांनीही कोकाटे यांच्या वर्तनावर नाराजी व्यक्त केल्याचे समजते. यामुळे पक्षात शिस्तीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

## शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) अर्थात उबाठा गटाने आपल्या अधिकृत प्रवक्त्यांची यादी जाहीर केली आहे. पक्षाने खासदार संजय राऊत आणि अरविंद सावंत यांची मुख्य प्रवक्तेपदी नियुक्ती केली आहे. याशिवाय अनिल परब, प्रियंका चतुर्वेदी आणि सुषमा अंधारे यांचीही प्रवक्तेपदी निवड करण्यात आली आहे.

तसेच हर्षल प्रधान, आनंद दुबे आणि जयश्री शेळके यांनाही प्रवक्ते म्हणून जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या घोषणेमुळे पक्षाच्या रणनीतीत नवे पर्व सुरू झाल्याचे संकेत मिळत आहेत.

संजय राऊत हे पक्षाचे ज्येष्ठ नेते असून, राज्यसभेचे खासदार आणि 'सामना' या पक्षाच्या मुखपत्राचे संपादक म्हणून कार्यरत आहेत. त्यांची आक्रमक शैली आणि पक्षनिष्ठा यामुळे ते ठाकरे गटाचे प्रमुख चेहरा मानले जातात. अरविंद सावंत हे लोकसभेचे खासदार असून, अनिल परब हे लोकसभा सदस्य असून, कायदेशीर आणि राजकीय रणनीतीत त्यांचा हातखंडा आहे. प्रियंका चतुर्वेदी या राज्यसभेच्या खासदार असून, तरुणांमध्ये त्यांची लोकप्रियता उल्लेखनीय आहे.

## गोडांबेवाडी बनले देशातील पहिले संविधानमय गाव

### गावात 'संविधानमय कुटंब' उपक्रम:प्रत्येक घरात पोहोचले संविधान

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ९ :** पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील गोडांबेवाडी नं. १ हे गाव देशातील पहिले संविधानमय गाव झाले आहे.



शासनाच्या 'घरघर संविधान' योजनेअंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिक्षक विजय वडवेराव यांनी पुढाकार घेऊन गोडांबेवाडीतील प्रत्येक घरात संविधान पोहोचवले आहे. गावातील नागरिकांनी या उपक्रमाला प्रतिसाद देत भारतीय संविधानाचे महत्त्व स्वीकारून ते आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्यावर भर दिला आहे.

सर्वसामान्य नागरिकांत संविधानाचा प्रचार व प्रसार व्हवा, संविधान जागृती व्हावी म्हणून विजय वडवेराव महाराष्ट्रभर संविधानदूत म्हणून कार्य करत आहेत. त्यांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना संविधानदूत म्हणून तयार केले असून, स्वखचार्तून त्या सर्व विद्यार्थ्यांना संविधानदूत गणवेश दिला.

त्यांनी विद्यार्थ्यांकडून संविधान उद्देशिका व संविधानातील नागरिकांचे हक्क, अधिकार व कर्तव्ये तोंडपाठ करून घेतली आहेत. सर्व विद्यार्थ्यांना संविधानाची गोडी लावत शालेय वयातच त्यांच्या मनात संविधानाविषयी आदरभाव, प्रेम निर्माण करून त्यांच्यात सांविधानिक मूल्ये रुजवली आहेत.

वडवेराव यांनी आपल्या शाळेच्या विद्यार्थ्यांना सोबत घेऊन २६ नोव्हेंबर २०२४ या संविधान दिनापासून गावात संविधान जागर अभियान सुरु केले व गावात 'संविधानमय कुटंब' हा उपक्रम राबवला. विद्यार्थ्यांनी गावातील प्रत्येक कुटुंबात, सर्व वीटभट्टया, बांधकाम ठिकाणावर प्रत्यक्ष जात कष्टकरी, मजूर, शेतकरी अशा समाजातल्या तळागाळातील अगदी शेवटच्या घटकाला भारतीय संविधानाने त्यांना दिलेले हक्क अधिकार व कर्तव्ये समजावून सांगितली.

विजय वडवेराव म्हणाले, प्रत्येक कुटुंबात संविधानाच्या प्रतीचे मोफत वाटप केले. प्रत्येक कुटंबाच्या दरवाजावर संविधामय कुटुंब असे स्टिकर लावून कुटुंब क्रमांक टाकण्यात आला. जवळपास १२० कुटुंबात भारतीय संविधान मोफत दिले. त्यामुळे प्रत्येक कुटुंबात संविधान असणारे तालुक्यातील हे गाव देशातील पहिले संविधानमय गाव ठरले आहे.

यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रदीप गोडांबे, रिहे केंद्राचे केंद्रप्रमुख शशिकांत मोरे, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य पालक, ग्रामस्थ, घोटावडे ग्रामपंचायतच्या सरपंच वैशाली कुंभार, ग्रामपंचायत सदस्य संतोष गोडांबे, शाळेतील सहशिक्षक व रिहे केंद्रातील आदिनाथ बोरकर व शिक्षकांनी सहकार्य केले.

## आंबेडकरी बाप हे साहित्यातील मैलाचा दगड ठरणारे पुस्तक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी "आंबेडकरी बाप" हे पुस्तक अत्यंत महत्वाचे असून आंबेडकरी साहित्यातील मैलाचा दगड ठरणार असल्याचा विश्वास डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र व साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव, ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ. प्रदीप आगलावे यांनी केले.



प्रा. शुक्राचार्य गायकवाड, सुमेरू प्रकाशन डोंबिवली यांच्या आंबेडकरी बाप या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा सर्व्हेश हॉल डोंबिवली येथे मुंबई म.न.पा.चे नगर अभियंता महेंद्र उबाळे यांच्या हस्ते पार पडला. त्याप्रसंगी आगलावे बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. प्रदीप आगलावे तर प्रमुख पाहुणे म्हणून समाजभुषण केशव भोईर, साहित्यिक विचारवंत डी. टी. गायकवाड, दामोदर मोरे, संपादक कुणाल बबन कांबळे, विचारवंत भरत शिरसाठ हे उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते तथागतांच्या मूर्तीला व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. डॉ. सिद्धार्थ मोरे व वृषाली करलाद यांनी भिमगीते गायली. मान्यवर लेखकांना स्मृती चिन्ह, आंबेडकरी बाप पुस्तकाची प्रत देऊन सन्मानीत करण्यात आले.

डॉ. आगलावे आपल्या भाषणात पुढे म्हणाले, आंबेडकरी विचारांची चळवळ प्रभावीत होण्यासाठी विचाराला खतपाणी घालावे लागते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार समाजमनावर रूजवण्यासाठी साहित्यिकांनी प्रयत्न केला पाहिजे. आंबेडकरी बाप हे पुस्तक आंबेडकरी विचारांची जाणीव ठेवुन नव्या साहित्याला जन्म देत असून पुढील पिढीत आंबेडकरी विचारधारा जिवंत ठेवुन संक्रमीक करणारे आहे. ते आंबेडकरी निष्ठेचे बावनकशी आंबेडकरी सोन आहे.आंबेडकरी बापांची अनेक रूपे या पुस्तकातुन पाहावयास मिळतील तेव्हा आंबेडकरी वैचारीक मुल्यांचा अभ्यास होवुन आंबेडकरी बाप असलेल्या योध्दांचे शब्दबध्द होवुन काही आंबेडकरी बाप शोधुन त्यांनाही इतिहासबध्द केले पाहिजे.

याप्रसंगी इतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. संचालन समाधान मोरे यांनी केले तर प्रा. संदेश गायकवाड यांनी आभार मानले. या प्रसंगी समाजातील विविध स्तरातील मान्यवर, पुस्तक प्रेमी, उपासक, उपासिका उपस्थित तसेच डोंबिवली आणि इतर भागातील साहित्यिक उपस्थित होते.

# शेलुबाजार श्रीराम मंदिरात प्रभू रामचंद्र जन्मोत्सव भक्ति भावात साजरा

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**शेलुबाजार**- मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्रीराम यांच्या जन्मोत्सवानिमित्त शेलुबाजार येथील श्रीराम मंदिरात दिव्य आणि भक्तिमय वातावरणात उत्सव साजरा करण्यात आला.



प्रभू श्रीरामांच्या चरणी समर्पण भावाने ग्रामस्थ एकत्र आले व सामूहिक पूजन करण्यात आले.

सकाळपासूनच मंदिर परिसर भक्तगणांनी गजबजलेला होता. रामभक्तांच्या 'जय श्रीराम' घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले होते. सामूहिक पूजनानंतर सर्वांना प्रेमपूर्वक खिचडी प्रसाद वाटप करण्यात आला. यानंतर संपूर्ण गावातून भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक रस्त्यावर, चौकात प्रभू श्रीरामांची प्रातिमा पूजन करून भक्तांनी दर्शन घेतले. मारवाडी युवा मंच शाखा शेलुबाजारचे अध्यक्ष आणि सदस्यांनी या उत्सवात सक्रिय सहभाग नोंदवला. रॅलीमध्ये रंग, गुलाल, फटाक्यांची आतिषबाजी, आणि 'श्रीराम जय राम जय जय राम' या गजरांनी संपूर्ण गाव भक्तिरसात न्हालं. विविध ठिकाणी बुंदी लाडू व इतर प्रसाद भक्तांना वाटण्यात आले. संपूर्ण उत्सव शिस्तबद्ध व शांततेत पार पडत, प्रभू श्रीरामांच्या करुणा व दयाळूपणाचे स्मरण करत ग्रामस्थांनी त्यांच्या जीवनमूल्यांची आठवण जागवली.

## अंधाचे कुणीतरी डोळस व्हा आणि हक्काचे घर द्या...

# निराधाराचे आधार व्हा, शासनाला दिव्यांगाची हाक

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मालेगाव** - वाशिम जिल्ह्यातील शिरपूर येथील रहिवाशी वच्छला किसन गायके राहणार शिरपूर जैन वार्ड क्रमांक ४,ता.मालेगाव जि. वाशीम. या महिलेला आईबाप नाही. सावत्र भाऊ सांभाळ करतोय घरकुल मिळणेबाबत शिरपूर ग्रामपंचायत मध्ये याबाबतचे निवेदन दिलेले आहे. परंतु शासनाच्या एका अध्यादेश व धोरणामुळे कोणतीही ग्रामपंचायत शासकीय जागा घरकुलासाठी देऊ शकत नाही.

त्यामुळे या अंध व्यक्तीला या बाबीमुळे घरकुल मिळाले नाही. याबाबतचे निवेदन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, एकनाथ शिंदे, आणि विधान परिषद आमदार भावनाताई गवळी यांना आज दिनांक ९ मार्च २०२५ रोजी मुंबई येथे सामाजिक कार्यकर्ते दिलीप विश्वंभर यांनी आधार देत यांचे सोबत जाऊन निवेदन देणार आहेत व काल दिनांक ८ मार्च २०२५ रोजी माजी आमदार दिव्यांगाचे दाते बच्चुभाऊ कडू यांच्याकडे निवेदन दिले आहे. ही महिला धनगर जातीची असून त्यांच्याकडे तसे प्रमाणपत्र ही आहे. आजही



दिव्यांग व्यक्तीला हक्काच्या लाभासाठी मुंबई गाठावी लागते. हे मात्र दुर्दैव आहे. परंतु दिलीप विश्वंभर सारखे लोक सामाजिक बांधिलकी ठेवून अशा अंध व्यक्तीला न्याय देण्याचे काम मार्गी लावत आहेत. त्यामुळे या अंध व्यक्तीला न्याय मिळेल अशी अपेक्षा शिरपूर शहरातील सर्व समाज बांधवांनी केली आहे. तसेच वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्ता पाटील भरणे यांना सुद्धा हे निवेदन देण्यात येणार आहे व पालकमंत्री वच्छला गायके दोन्ही डोळ्यांनी अंध असलेल्या महिलेला घरकुलाचा लाभ मिळेल अशी आशा पालकमंत्री महोदयाकडून पूर्ण होईल. व अशा दिव्यांग व्यक्तीला प्राधान्य देऊन त्याचा नक्की विचार होईल अशी आर्त हाक दिव्यांग व्यक्तीकडून देण्यात येत आहे. दिव्यांगाचे आधार बना आणि त्यांना हक्काचे घरकुल द्या. केविलवाणी आर्त हाक वच्छला गायके या अंध व्यक्तीने आपले निवेदन घेऊन थेट मुख्यमंत्र्याकडे उपमुख्यमंत्र्याकडे निवेदन देऊन साकडे घालणार आहे.

# महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीदिनी शासकीय सुट्टी जाहीर करा

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - क्रांतिसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीदिनी दि. ११ एप्रिल रोजी शासकीय सुट्टी जाहीर करावी व त्या संदर्भात शासन निणऱ्य निर्गमित करावा अशी मागणी क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती वाशिम च्या वतीने दि. ७ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.





निवेदनानुसार, क्रांतिसुर्य महात्मा जोतीराव फुले हे समस्त भारतवासीयांचे प्रेरणास्त्रोत आहेत. सामाजिक क्रांतीचे अग्रदूत म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांनी आयुष्यभर समस्त देशावासीयांसाठी आपले आयुष्य खर्ची घातले आहे. समाजातील अनिष्ट प्रथा आणि परंपरांना मूठमाती देऊन एक नवा सत्यशोधनाचा वैज्ञानिक दृष्टिकोन देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. त्यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षित करून पुण्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली आणि अखंड भारतातील महिलांना शिक्षणाची दारे खुली केली. आज भारताच्या राष्ट्रपती महिला असल्याचे श्रेय फुले दांपत्यांनाच जाते. त्यांच्या अनमोल सामाजिक योगदानामुळे समाजातील दलित, पीडित, वंचित, शोषित घटकांना नवी दिशा मिळाली आहे. त्यामुळे क्रांतिसुर्य महात्मा जोतीराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य व विचारांचा समाजात जागर होण्यासाठी त्यांच्या जयंतीदिनी शासकीय सुट्टी असणे गरजेचे आहे.

सदर दिवशी शासकीय सुट्टी असल्यास त्यांच्या विचारांचा जागर तसेच प्रचार - प्रसार चांगल्या पद्धतीने केला जाऊ शकतो. म्हणून क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीदिनी दि. ११ एप्रिल २०२५ रोजी तसेच यापुढील प्रत्येक वर्षी महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीदिनी शासकीय सुट्टी जाहीर करावी. व तसा शासन निणऱ्य निर्गमित करावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर लक्ष्मणराव इंगोले, उज्वल देशमुख, डॉ. रामकृष्ण कालापाड डॉ. सिताराम वाशिमकर, गजानन धामणे, मिलिंद सुर्वे, वैभव नारायण उलेमाले, अनिल रामचंद्र मडके, समाधान गिऱ्हे, सुरेश इंगोले, देव इंगोले, पंकज गाडेकर, गणेश मोहळे, महादेव हरकळ, प्रा. मंगेश भुताडे, गजानन भोयर, गणेश सुर्वे, भगवानराव मडके, अशोक हेडा, सौ. रंजनाताई संतोष पारिस्कर, राजू किडसे पाटील, रामाभाऊ इंगळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदन देताना क्रांतिसुर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक उत्सव समितीच्या सदस्यांची उपस्थिती होती.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' उद्घाटन सोहळा उत्साहात

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - दि. ८ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, वाशिम येथे सकाळी ११ वाजता 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला. अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तींच्या सर्वांगिण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच जनतेत जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने दरवर्षी दि. ८ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत जिल्ह्यामध्ये 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह ' हा कार्यक्रम साजरा करण्यात येत असून त्याअंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.



सदर कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून प्रादेशिक उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, वाशिम शरद चव्हाण, अध्यक्ष म्हणून प्रकाश गवळीकर (डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त), प्रमुख अतिथी म्हणून वनमाला पेंढारकर, मोहन भगत (डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त), सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, वाशिम एम. जी. वाठ तसेच विशेष अधिकारी, शासकीय निवासी शाळा आर. एस. चोंडकर हे उपस्थित होते. सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले . तसेच सर्व मान्यवरांचे स्वागत पुष्प व 'सवोत्तम भूमिपुत्र : गौतम बुद्ध' हे पुस्तक देवून केले. त्यानंतर आपल्या प्रास्ताविक भाषणामध्ये समाज कल्याण निरीक्षक आर. ए. शिरभाते यांनी 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' कार्यक्रमाची रूपरेखा विशद केली. त्याअंतर्गत आयोजित करावयाच्या कार्यक्रमाची माहिती सांगून सदर कार्यक्रमाचा लाभ सर्वांनी घेण्याचे आवाहन केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे मोहन भगत यांनी आपल्या मनोगतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकत त्यांनी देशासाठी केलेल्या विविध कार्यांची माहिती दिली. प्रादेशिक उपायुक्त शरद चव्हाण यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन करून सांगितले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाची भूमिका ही सर्वसामान्यांना या कार्यक्रमाची माहिती व्हावी, त्यांचा लाभ घेता यावा, तसेच त्यांच्या जीवनात परिवर्तन घडून यावे अशी आहे. वंचित घटकांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास घडवून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत असे त्यांनी सांगितले. त्यानंतर अध्यक्षीय भाषणात प्रकाश गवळीकर यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या व सप्ताहा अंतर्गत होणाऱ्या विविध कार्यक्रमांत सहभागी होण्याचे आवाहन केले. तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती वंचित घटकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य या सप्ताहाच्या निमित्ताने सर्वांनी पार पाडावे असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज राठोड यांनी केले तर आभार प्रदर्शन एस. एस. पाटील (समाज कल्याण निरीक्षक) यांनी केले. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील जेष्ठ नागरिक, गुणवंत मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, वाशिम येथील विद्यार्थी, महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच अनिल गायकवाड, व्यवस्थापक, स्मार्ट इंडिया प्रा. लि. आणि कंपनीचे सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्रिकेट स्पर्धेत मयुर राठोड यांची चमकदार कामगिरी

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - पुणे - येथे नुकत्याच पार पडलेल्या इन्फोसिस लीग क्रिकेट स्पर्धेत मयुर माणिकराव राठोड याने आपल्या अप्रतिम गोलंदाजीच्या जोरावर चार फलंदाजांना बाद करत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. त्यांच्या या उत्कृष्ठ कामगिरीबद्दल त्याला 'सवोत्कृष्ट खेळाडू' म्हणून गौरवण्यात आले.मयुर राठोड हा वाशिम जिल्ह्यातील जनुना सोनवळ या ग्रामीण भागातून येणारा एक मेहनती आणि अभ्यासू खेळाडू आहे. आर्थिक परिस्थिती हलाखीची असूनही त्याने (ं. ण्दस्ज्ू) ची पदवी प्राप्त केली आहे. शिक्षणासोबतच त्याला क्रिकेटची आवड असल्यामुळे त्याची निवड भूतान येथे होणा?या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी झाली होती, मात्र घरच्या आर्थिक अडचणींमुळे तो तिथे सहभागी होऊ शकला नाही.



तथापि, पुणे येथे झालेल्या या महत्त्वाच्या सामन्यात त्याने आपल्या कौशल्यपूर्ण खेळीमुळे संघाला ट्रॉफी मिळवून दिली. त्याच्या या यशस्वी कामगिरीबद्दल त्याचे

माणिकराव राठोड, संदीप जाधव सर, विकास सानप साहेब, राजेश इढोळे साहेब, संजय वाघ सर, गजानन गोरे, सतिशभाऊ वानखेडे (गल्ला), कैलास मामा कव्हर, सतिशभाऊ टाले, ढोले साहेब, संजुभाऊ वैष्णव, गजानन काकडे साहेब, बालाजीभाऊ दहात्रे, गोलु कावरखे, ओम कव्हर व जय गजानन महाराज मित्र मंडळ, दत्तनगर लाखाळा, वाशिम. आदिसह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# नित्य साई श्रद्धा योग कक्षाकडून श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**शेलुबाजार वार्ता** - नित्य साई श्रद्धा योग कक्षा, शेलुबाजार यांच्यातर्फे श्रीराम जन्मोत्सवानिमित्त श्रीराम प्रभू यांच्या प्रतिमेचे सामूहिक पूजन करण्यात आले. या विशेष प्रसंगी योग कक्षाच्या सदस्यांनी श्रद्धा व भक्तीभावाने कार्यक्रमात सहभाग घेतला.

योग कक्षाच्या वतीने नियमितरित्या विविध उपक्रम राबवले जात असतात. त्यामध्ये महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी आणि सामाजिक उपक्रम यांचा समावेश असतो. मंगरूळपीर तालुक्यातील एकमेव सक्रिय योग संघटना म्हणून नित्य साई श्रद्धा योग कक्षा परिचित आहे. यंदा श्रीराम जन्मोत्सवाचे औचित्य साधून, साई श्रद्धा मंदिर (अकोला रोड) येथून श्रीराम मंदिरापर्यंत भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीमध्ये सर्व सदस्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला आणि 'राम जन्मोत्सव' गीत गात वातावरण भक्तिमय केले. कार्यक्रमाचा समारोप भक्तिभावाने पार पडला.



# छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचा २१ दिवस जलाभिषेक

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - राजे छत्रपती ब्लड डोनर गृपतर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १७ मार्चपासून सलग २१ दिवस त्यांच्या पुतळ्याचा जलाभिषेक करण्यात आला. या उपक्रमाचा समारोप रामनवमीच्या दिवशी, ६ एप्रिल रोजी करण्यात आला.

या कार्यक्रमात विविध वेशभूषा आणि सांस्कृतिक सादरीकरणासाठी रुद्रायणी सचिन राऊत (राजमाता जिजाऊ), संस्कृती टेकाळे (ताराराणी), ममता नवघरे, सांची टाले, लिना कांबळे, श्रृष्टी घुगे, सानिका रोकडे, तन्नू वानखेडे यांचा गौरव प्रमाणपत्र व शिल्ड देऊन करण्यात आला.



सदर उपक्रमास नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. यामध्ये अजय मोतीवार, मनिष डांगे, सौ. संध्या सभादिंडे, पुरण बदलाणी, कुणाल लंके, मंगेश वानखेडे, एनसीसी विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते व अनेक नागरिक सहभागी झाले होते.

# मुंदडा विद्यालय दहावीच्या बॅचने तेहतीस वर्षांनंतर 'पुन्हा एक दिवस शाळेचा' अनुभवला

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मालेगाव**- सकाळी शाळेची घंटा वाजली आणि अगदी शाळेच्या प्रार्थनेपासून ते थेट वर्गातील धूमशान पर्यंतच्या सर्व गोष्टी करून या एका दिवसात मुंदडा विद्यालय दहावीच्या सन १९९२ बॅचने तेहतीस वर्षांनंतर 'पुन्हा एक दिवस शाळेचा' अनुभवला.

नाथुराम नारायदास मुंदडा विद्यालयातील या सर्वांनी आपले बालपण पुन्हा एकदा अनुभवले.

आपल्या सर्व गुरूवर्याचा सत्कार करून त्यांचे आशिर्वादही त्यांनी घेतले. सगळे विद्यार्थी शिक्षकांसह मिरवणुकीने शाळेत दाखल झाले. आपण कितीही मोठे झालो, वेगवेगळया क्षेत्रात यशस्वी झालो तरी शालेय जीवनातील मौज काही वेगळी असते. आपली शाळा आणि शाळेतील ते सोनेरी दिवस कोणी विसरू शकत नाही; पण काळ कधी थांबत नाही. सरलेले दिवस पुन्हा येत नाहीत. तरीही ना.ना. मुंदडा विद्यालयाच्या १९९१-९२ च्या दहावीच्या बॅचने शाळेतील त्या आठवणी तब्बल तेहतीस वर्षांनी पुन्हा जागवल्या 'गेट टुगेदर ' या उपक्रमाद्वारे. १९९२ च्या बॅच च्या काही मित्र- मैत्रिणींचा व्हॉट्स ?प ग्रुप तयार केला. अनेक मित्र-मैत्रिणी हळूहळू या ग्रुपमध्ये सहभागी होत गेले आणि 'गेट टुगेदर' ची संकल्पना पुढे आली. दिवस ठरला रविवार, ६ एप्रिल.

सकाळी साडेआठ वाजता .

त्या दिवशी सकाळपासूनच शाळेचा आवार या विद्यार्थ्यांनी फुलू लागले होते. दूर दूर गेलेले सर्व जण एकमेकांना भेटत होते. सेल्फी काढत होते. सर्वांचा एक युनिफॉर्म ठरला होता. पांढरा कुर्ता व निळ्या रंगाची जीन्स, मिरवणुकीने सर्व जण शिक्षकां सोबत प्रार्थनेच्या ठिकाणी गोळा झाले. शाळेत असताना व्हायची तशी घंटा वाजली. सर्व जण एका रांगेत उभ राहिले. त्यानंतर प्रांगणात उपस्थित सेवानिवृत्त शारीरिक शिक्षक वसंत अवचार यांनी सगळयांना एकत्र करून राष्ट्रगीताने कार्यक्रमाला सुरुवात केली. त्यानंतर सर्व विद्यार्थी आपल्या वर्गात रांगेत जाऊन बसले.



यावेळी उशिरा आलेल्या विद्यार्थ्यांना अवचार यांनी पूर्वी प्रमाणे छडीचा मार देऊन शिक्षा केली. वर्गात उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी आपापल्या परिचय आपण सध्या करीत असलेल्या कामाचा आलेख सर्वांसमोर मांडला. त्याच बरोबर आपली मुलं काय करतायेत हेही सांगितले. त्यानंतर गुरुवारच्या सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सन्माननीय सचिव आशीष मुंदडा हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यमान मुख्याध्यापक दिनेश उंटवाल , श्रीकिसन पर्व्हे मानधने , माजी मुख्याध्यापक सारडा , निवृत्त मुख्याध्यापक गणपत चव्हाण , निवृत्त सहशिक्षक सुधाकर पखाले ,

, अरविंद देशमुख, वसंत अवचार, विद्यमान उपमुख्याध्यापक नेरकर मॅडम, तर शिक्षकेतर कर्मचा?या मधून विष्णु शर्मा व संतोष एन्नेवार हे उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्व शिक्षका शाल श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर शाळेतील दिवंगत शिक्षक व विद्यार्थ्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी उपस्थित शिक्षक व संस्थेचे सचिव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून आपले भविष्य उज्वल करण्याचा आशीर्वाद दिला. विकास गवळी ,पंढरी देवळे व मीनाक्षी बिर्ला या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शालेय जीवनातील आठवणी जागवल्या. तर प्रा.डॉ.रेखा आढाव यांनी आपल्या मनोगता मधून गेट-टुगेदर संकल्पनेमागे सार्थक प्रयोजन असण्या विषयीचा आग्रह धरला. आपले जीवन आनंदी होण्यासाठी आपल्याला कुटुंबाने, समाजाने , शाळेने आणि गावाने भरभरून दिले आहे आता आपल्या कृतज्ञता व्यक्त करण्याची वेळ आली आहे. या गेट-टुगेदर च्या माध्यमातून आपण मित्र-मैत्रिणींनी वृक्षारोपणा सारख्या महत्त्वपूर्ण कार्य करिता आपले योगदान दिले पाहिजे असे सांगितले.

यावेळी अरविंद देशमुख यांनी रामनवमीच्या निमित्ताने रामा वरील एक गीत सादर करून सर्व वातावरण भक्तीमय . शिरीष लाहोटी यांनी लिहिलेली कविता व शेरोशायरी यावेळी सादर केली. यामध्य शिरीष लाहोटी,

भारत नाकाडे ,सचिन अग्निहोत्री ,दिलीप गट्टानी ,विनोद चव्हाण ,पंडीत घुगे,अमोल पांडे ,मनोज काळबांडे ,नितीन अवचार,गजानन घुगे,विकास गवळी,संतोष बियाणी, विजय जाधव ,विठ्ठल भानुसे आणि मुली मधून रेखा अढाव (राऊत),रचना सारडा (कोठारी),वर्षा भादिकर (गेडाम),मिनाक्षी बिरला (मुंदडा),गीता मुंदडा (सुरजन) , अनुसूया पाठक(खोत) ,ज्योती नागापुरे (गोफणे) , रेखा उगले व इतर विद्यार्थी उत्साहात हजर होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विठ्ठल भानुसे व प्रा.डॉ.रेखा आढाव तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.विजय जाधव यांनी केले.

दुपारी भोजनाचा आस्वाद घेतल्या विविध प्रकारच्या खेळाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सुरुवातीला गीता मुंदडा हिच्या आयोजनातून आपल्या शालेय जीवनातील एखादी वस्तू आणून दाखववी व माझ्याकडून भेट घेऊन जावी असा जो संदेश दिला होता त्या संदेशातून शोभा गोठवाड या विद्यार्थिनीने तिच्या काळातील शाळेची पेटी शाळेतील छायाचित्र व इतर साहित्य आणून मित्र मंडळांच्या कडून बक्षीस घेतले. यानंतर गीता मुंदडा येणे ५२ पत्ते व चिट्ठीच्या माध्यमातून एक खेळाचे आयोजन करून १२ बक्षिसाचे वितरण केले. तर मीनाक्षी बिर्ला हिनी सुद्धा चौकट खेळाच्या माध्यमातून स्पर्धा आयोजित केली. यानंतर विठ्ठल भानुसे यांनी कवितेच्या माध्यमातून १९९२ च्या व त्या संबंधित आजच्या काही आठवणी जागृत केल्या. यावेळी उपस्थित काही विद्यार्थ्यांनी शेरोशायरी, चुटकुले व चारोळ्या च्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या. डॉ.वर्षा गेडामने गित सादर केले. त्यानंतर मुलांची व मुलींची वेगवेगळी संगीत खुर्ची च्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यावेळी मुलांमधून विजय जाधव तर मुलींमधून चारुशीला वाटवाले हिने स्पर्धा जिंकली. सर्वांनी गाण्यावर ठेकाही धरला. या कार्यक्रमासाठी शिरीष लाहोटी प्रा. रेखा आढाव प्रा. विजय जाधव , नितीन आवचार, पंडित घुगे, मनोज काळपांडे, विनोद चव्हाण, संतोष बियानी ,भारत नाकाडे या सा?यांनी मेहनत घेतली . पुन्हा एकदा भेटायचे वचन एकमेकांना देत शाळेतचा तो एक अनोखा दिवस सरला होता.

# उमद्या कलाकाराचे असे अचानक जाणे..







मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील एक अत्यंत गुणी, बहुआयामी आणि लोकप्रिय अभिनेते विलास उजवने यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या अचानक जाण्याने मराठी कलाविश्वावर शोककळा पसरली असून चाहत्यांसह सहकलाकारही अत्यंत दुःखी झाले आहेत.

विलास उजवने यांनी आपल्या अभिनयाची सुरुवात रंगभूमीवरून केली होती. ते एक उत्कृष्ट रंगकर्मी म्हणून ओळखले जात होते. पुढे त्यांनी अनेक मराठी मालिकांमध्ये आणि चित्रपटांमध्ये काम करत आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या सहज अभिनयशैलीमुळे ते प्रेक्षकांच्या मनात घर करून राहिले.

विलास उजवने यांची खासियत म्हणजे त्यांनी विनोदी, गंभीर, ग्रामीण आणि शहरी अशा विविध प्रकारच्या भूमिका समर्थपणे रंगवल्या. त्यांची संवादफेक, चेहऱ्यावरचे हावभाव आणि सादरीकरणाची शैली यामुळे प्रत्येक भूमिका लक्षवेधी ठरली. त्यांनी देवकी, जय मल्हार, तुझ्यात जीव रंगला, चला हवा येऊ द्या यांसारख्या मालिकांमध्ये लक्षवेधी भूमिका साकारल्या. ग्रामीण भूमिकांमध्ये त्यांची छाप अधिक उठून दिसत असे. चित्रपटांमध्येही त्यांनी आपली कला सिद्ध केली होती.

विलास उजवने हे केवळ कलाकार नव्हते, तर एक हसतमुख, प्रेमळ आणि सदैव सकारात्मक दृष्टिकोन असलेले व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या हास्याच्या लहरींनी अनेकांचे आयुष्य खुलवले. गावोगावी नाटकांच्या दौऱ्यांतून त्यांनी रसिकांशी एक नातं निर्माण केलं होतं.

त्यांच्या निधनामुळे मराठी मनोरंजन सृष्टीत निर्माण झालेली पोकळी भरून न निघणारी आहे. त्यांनी आपल्या कामातून मराठी संस्कृतीचे दर्शन घडवले आणि प्रेक्षकांना अंतर्मुख करणारे अनुभव दिले. विलास उजवने यांना अखेरचा निरोप देण्यासाठी अनेक चाहत्यांनी आणि सहकाऱ्यांनी त्यांच्या घरी भेट दिली. त्यांच्या जाण्याने उरलेली आठवण ही त्यांच्या अमर भूमिकांमधून कायम राहील.

डॉ. उजवणे यांचा कलाजगतातील प्रवास हा केवळ अभिनयापुरता मर्यादित नव्हता. त्यांना शैक्षणिक पार्श्वभूमीही होती आणि म्हणूनच त्यांच्या भूमिकांमध्ये एक अभ्यासू सखोलता जाणवायची. रंगभूमीपासून ते रूपेरी पडद्यापर्यंतचा त्यांचा प्रवास हा नाट्यशास्त्राच्या प्रेमातून जन्मलेला होता.

**सामाजिक भान असलेला अभिनेता**

डॉ. विलास उजवणे यांनी अनेकदा सामाजिक आशय असलेल्या चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. 'डोम', 'इन द नेम ऑफ ताई' यांसारख्या चित्रपटांमध्ये त्यांनी सामाजिक विषमता, अन्याय आणि मूल्यभंग यावर बोट ठेवणा?या व्यक्तिरेखा रंगवल्या. त्यांच्या संवादफेकीत आणि देहबोलीत एक ताकद होती झ जी थेट प्रेक्षकांच्या मनापर्यंत पोहोचायची.

ते ग्रामीण भागातील जीवनाचे, संस्कृतीचे आणि माणसांचे खरे चित्र उभे करत असत. त्यांच्या भूमिकांमध्ये गावपणाचा गंध असायचा. 'गाव आलं गोट्यात १५ लाख खात्यात' किंवा 'धोलकी'सारख्या चित्रपटांमधून त्यांनी गावकऱ्यांचा आवाज बनून सामाजिक वास्तव दाखवले.

त्यांच्या निधनाने एक अशी शांत, पण दर्जेदार अभिनयशैली हरवली आहे, जी कधीही उगाच गोंगाट करत नव्हती, पण जेव्हा बोलायचं तेव्हा काळजात जाऊन भिडायची. मराठी सिनेसृष्टीसाठी ही फार मोठी पोकळी आहे.

**अभंगात रंगलेली जिवंत अनुभूती**

डॉ. विलास उजवणे हे मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीत बहुआयामी भूमिकांसाठी ओळखले जात होते. परंतु त्यांच्या अभिनय प्रवासातील एक खास टप्पा म्हणजे संत तुकाराम यांची भूमिका. ही भूमिका त्यांनी इतक्या श्रद्धा, समर्पण आणि आत्मिक भावनेने साकारली की ती प्रेक्षकांच्या मनावर कोरली गेली.

तुकाराम हे केवळ संत नव्हते; ते विचार होते, आंदोलन होते, लोकमानसातलं श्रद्धास्थान होते. अशा एका महामानवाची भूमिका साकारताना केवळ अभिनयाचीच गरज नसते, तर त्या व्यक्तिरेखेचा आत्मा आपल्या आत झिरपवावा लागतो. डॉ. उजवणे यांनी ही भूमिका साकारताना केवळ पोशाख, हावभाव यांच्यावर भर दिला नाही, तर त्यांच्या अभंगांतील आत्मिक ऊर्जा सादरीकरणातून झळकत होती.

डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर.
9422125656

**वाणी आणि देहबोलीतील संयम**

तुकारामांची भूमिका साकारताना डॉ. उजवणे यांनी दाखवलेली वाणीतील माधुर्य, शांतता आणि अंतरंगातील वेदनेचा संयमित आविष्कार यामुळे प्रेक्षक भारावून गेले. ते तुकाराम साकारणारे नव्हते ते झाले होते. त्यांची डोळ्यांतली भक्ती, शब्दांतला विश्वास, आणि देहबोलीतला समर्पणभाव – हे सगळं तितकंच जिवंत होतं.

**प्रबोधनपर रंगभूमीची ताकद**

त्यांनी ही भूमिका रंगभूमीवर अनेक ठिकाणी सादर केली होती. ग्रामीण भागातील तमाशा, लोकनाट्य, आणि भजन मंडळींसोबत मिळून त्यांनी तुकारामांचे विचार गावोगावी पोहोचवले. ही केवळ नाट्यकृती नव्हती, तर एक प्रकारची सामाजिक प्रबोधनाची चळवळ होती.

**अभंग वाचन आणि अनुभव**

डॉ. उजवणे हे स्वतः संत साहित्याचे अभ्यासक होते. त्यामुळे त्यांच्या तुकाराम सादरीकरणात अभंगांचा फक्त गानामधील उपयोग नव्हता, तर त्या शब्दांचा अर्थ, त्यामागचं तत्त्वज्ञान आणि सामाजिक विद्रोह यांचेही दर्शन घडायचे.

**एक जिवंत तुकाराम**

आजही अनेक प्रेक्षक, रसिक, आणि कलावंत डॉ. उजवणे यांचे तुकाराम म्हणून केलेले सादरीकरण आठवतात तेव्हा डोळ्यांत पाणी येते. ही भूमिका त्यांनी ज्या निष्ठेने साकारली, ती अभिनयाच्या पलीकडची होती.. ती होती भक्तीची अनुभूती.

डॉ. विलास उजवणे यांच्या तुकाराम भूमिकेने मराठी रंगभूमीवर एक भक्तिरसाचा नवा अध्याय लिहिला. ते एका कलाकारापेक्षा जास्त एक विचार बनले.

**डॉ विलास उजवणे आणि नागपूर**

डॉ. विलास उजवणे यांचे नागपूर शहराशी विशेष नाते आहे. त्यांनी नागपूरमध्ये आपले बालपण आणि शिक्षण पूर्ण केले. नागपूरमधील रंगभूमीवर त्यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली.

नागपूरच्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखेच्या वर्धापन दिन आणि पुरस्कार सोहळ्यात २०२४ मध्ये त्यांनी तरुण कलाकारांना मुंबईत आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन दिले. ते म्हणाले, "नागपूरने अनेक महान आणि प्रभावशाली कलाकार घडवले आहेत. मी स्वतः येथे माझ्या ज्येष्ठांकडून खूप काही शिकलो आहे."

डॉ. विलास उजवणे हे नागपूरचे रहिवासी आहेत. त्यांनी नागपूरमध्ये आपले बालपण आणि प्रारंभिक शिक्षण पूर्ण केले. नंतर त्यांनी अभिनय क्षेत्रात करिअर करण्यासाठी मुंबईकडे प्रयाण केले. एका मुलाखतीत त्यांनी सांगितले की, "मी नागपूरचा आहे, परंतु आता मुंबईत स्थायिक झालो आहे." त्यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. २०१६ साली विदर्भ गौरव प्रतिष्ठानने त्यांना स्मिता पाटील पुरस्काराने सन्मानित केले होते.

**आमच्या घरी सदिच्छा भेट**

काही वर्षांपूर्वी नागपूरला आले असताना त्यांना अर्धांगवायूचा त्रास झाला त्यामुळे त्याचा पाय, हात व वाचा ही बाधित झाली. त्यामुळे ते माझ्याकडे उपचाराकरिता आले होते. त्यांना बराच फायदा झाला आणि आमचे सबंध घट्ट झाले. त्यांनी आमच्या घरी आवर्जून भेट दिली. त्या आठवणी आता आठवणीच राहतील.

■ ■ ■

# वाजपेयी ते मोदी...

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून ज्याची नोंद झाली आहे, अशा भारतीय जनता पार्टीच्या (भाजपा) ४५ वर्षांच्या इतिहासात अनेक चढ-उतार आले. भाजपाची स्थापना ६ एप्रिल १९८० मध्ये झाली, पण या पक्षाची नाळ १९५१ मध्ये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी स्थापन केलेल्या भारतीय जनसंघाशी जोडलेली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या पहिल्या सरकारमध्ये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी हे सदस्य होते. पण काँग्रेस पक्षाची धर्मनिरपेक्ष राजनीती व मुस्लिमांचे लांगूलचालन याच्या ते सुरुवातीपासून विरोधात होते. डॉ. मुखर्जी यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली व राष्ट्रवाद आणि हिंदू राष्ट्रवादी विचारधारेला त्यांनी उत्तेजन दिले. १९५२ मध्ये झालेल्या लोकसभेच्या पहिल्या निवडणुकीत भारतीय जनसंघाचे केवळ तीन खासदार निवडून आले होते. १९७७ पर्यंत भारतीय जनसंघ पक्ष संसदेत नगण्य होता.

-------------

तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी १९७५ मध्ये देशात आणीबाणी लागू केली व त्याला भारतीय जनसंघाने जोरदार विरोध केला. अठरा महिने भारतीय जनसंघासह देशातील सर्वच प्रमुख विरोधी पक्षांचे शेकडो नेते व हजारो कार्यकर्ते जेलमध्ये होते. १९७७ मध्ये इंदिरा गांधींच्या सरकारने आणीबाणी मागे घेतली आणि देशात लोकसभा निवडणुका घोषित झाल्या. त्या वेळी देशातील सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन लोकनेते जयप्रकाश नारायण यांच्या प्रेरणेतून जनता पक्षाची स्थापना केली.

केंद्रात मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले, पण अंतर्गत लाथाळ्या, गटबाजी, अहंकार आणि जनता पक्षातील पूर्वाश्रमीच्या जनसंघीयांच्या दुहेरी सदस्यत्वाच्या मुद्द्यावरून समाजवाद्यांनी घेतलेला आक्षेप, यामुळे मोरारजी देसाई सरकार अडीच वर्षांतच कोसळले. जनसंघीयांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध ठेवता कामा नयेत अशी भूमिका मधू लिमये व अन्य समाजवादी नेत्यांनी घेतली होती. जनसंघातील नेत्यांनी त्याला धूप घातली नाही. जनता पक्षात फूट पडली. पूर्वाश्रमीच्या भारतीय जनसंघातील नेत्यांनी स्वतंत्र मार्गावर जाण्याचे ठरवले आणि त्यातूनच भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली.

भाजपाचे पहिले अध्यक्ष म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांची निवड झाली. सुरुवातीच्या काळात भाजपाला फारसे यश लाभले नाही. पण राम जन्मभूमी आंदोलन सुरू झाले आणि भाजपाला यशाचा मार्ग सापडला. राम जन्मभूमी आंदोलनानेच भाजपाला दिल्लीच्या तख्तापर्यंत पोहोचवले.

देशाच्या राजकारणात भाजपाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. १९९० सालापर्यंत भाजपा-काँग्रेस पक्षाला केंद्रात आणि विविध राज्यांत सत्तेवरून उलथवून टाकेल असे कोणत्याही ज्योतिष्याने भविष्य वर्तवले नव्हते. लाखो कार्यकर्त्यांची मेहनत, अमितभाई शहा यांचे संघटन कौशल्य आणि नरेंद्र मोदींचा करिष्मा यातून आज देशात २० हून अधिक राज्यांत भाजपा सत्तेवर आहे. सोळा राज्यांत भाजपाचे स्वतःचे सरकार आहे.

अटल-अडवाणी कमल निशान, माँग रहां हैं हिंदुस्थान..., राज तिलक की तैयारी करों, आ रहें है, भगवाधारी... मंदिर वही बनाएंगे, अशा घोषणा देत अटल-अडवाणींच्या काळात भाजपाने दिल्लीकडे वाटचाल केली.

गेल्या अकरा वर्षांपासून भाजपामध्ये मोदी-शहा यांचे पर्व सुरू झाले आहे. घर घर मोदी-हर हर मोदी, जो राम को लाएं हैं, हम उनको लाएंगे अशा घोषणांतून देशभर भाजपाचा विस्तार झालाय. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशींच्या काळात भाजपा मित्रपक्षांच्या शोधात होती, आता देशात भाजपा केंद्रस्थानी राहणार हे देशातील सर्व प्रादेशिक पक्षांनी कळून चुकले आहे. स्वबळावर केंद्रात भाजपाची सत्ता स्थापन करण्याचा पराक्रम मोदींनी करून दाखवला. २०१४ मध्ये लोकसभेत भाजपाचे २८२ खासदार निवडून आले, तर २०१९ मध्ये भाजपाचे ३०३ खासदार विजयी झाले. सन २०२५ मध्ये अब की बार चार सौ पार हे भाजपाचे स्वप्न होते पण ते भंगले.

२०२४ मध्ये भाजपाचे सर्वाधिक म्हणजे २४० खासदार निवडून आले व मित्रपक्षांच्या मदतीने लोकसभेत २९३ आकडा गाठला व सलग तिसऱ्यांदा एनडीएचे सरकार स्थापन झाले.

नरेंद्र मोदींनी पंतप्रधानपदाची हॅटट्रीक संपादन तर केलीच. पंडित नेहरूंनंतर हॅटट्रीक साधणारे देशाचे दुसरे पंतप्रधान अशी त्यांची इतिहासात नोंद झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदींची हिम्मत आणि लोकप्रियता, अमितभाई शहांची चाणक्यनीती, आदित्यनाथ योगींचे आक्रमक हिंदुत्व यातून भाजपाचा अश्वमेध देशभर आज दौडताना दिसतो आहे.

पण या ४५ वर्षांच्या वाटचालीत अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी आदींची तपस्या, धैर्य व त्याग यांचे मोठे योगदान आहे. अडवाणी यांच्या राम रथयात्रेने व जोशींच्या तिरंगा यात्रेने पक्षाला देशपातळीवर नेले व पक्षात नवचैतन्य निर्माण केले. देशात अनेक राजकीय पक्ष आहेत की, त्यांच्यात वारंवार फाटाफूट झाली किंवा विभाजन झाले. भाजपा हा एकच पक्ष आहे की, तो सर्वत्र विस्तारत असतानाही अभंग आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्कारातून तयार झालेले कार्यकर्ते हा भाजपाचा मुख्य आधार आहे. तो कधी विचलीत होत नाही, निष्ठा बदलत नाही. त्याला सत्तेचा मोह नाही. त्याची बांधिलकी विचारांशी आहे.

अयोध्येत भव्य राम मंदिर उभारून भाजपाने सर्व देशांतील कोटी कोटी जनतेची इच्छा पूर्ण केली. जम्मू-काश्मीरला विशेषाधिकार दिलेल्या घटनेतील ३७० व्या कलमाचे सुरक्षा कवच काढून घेतले, लोकसभा-विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा कायदा संसदेत मंजूर करून घेतला, वक्फ बोर्डाच्या मनमानी कारभारावर लगाम घालणाऱ्या कायद्यात सुधारणा केली, तिहेरी तलाक पद्धत रद्द करून लाखो मुस्लीम महिलांना दिलासा दिला.

राष्ट्रवाद व सांस्कृतिक एकता या विचारांना भाजपाने नेहमीच प्राधान्य दिले. एनडीएमधील जुन्या मित्र पक्षांबरोबरच नव्याने एनडीएमध्ये आलेल्या मित्रपक्षांना सन्मान देण्यासाठी भाजपाला अनेकदा कसरत करावी लागते आहे.

इंदिरा गांधींच्या हत्येनंतर निर्माण झालेल्या सहानुभूतीच्या लाटेमुळे १९८४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे ४०० पेक्षा जास्त खासदार निवडून आले होते व भाजपाचे केवळ दोनच खासदार विजयी झाले. दोन खासदारांपासून भाजपाची सुरुवात झाली आणि गेल्या तीन निवडणुका सर्वाधिक खासदारांचा पक्ष म्हणून भाजपाने संसदेत स्थान मिळवले.

अटलबिहारी वाजपेयी हे (१९८० ते १९८६) भाजपाचे पहिले अध्यक्ष होते व देशाचे तीन वेळा पंतप्रधान झाले. लालकृष्ण अडवाणी हे (१९८६ ते ९१, १९९३ ते ९८, २००४-२००५) तीन वेळा पक्षाचे अध्यक्ष होते, देशाचे गृहमंत्री व उपपंतप्रधान झाले. मुरली मनोहर जोशी (१९९१-९३), कुशाभाऊ ठाकरे (१९९८-२०००), जना कृष्णमूर्ती (२००२-२००४), वेंकय्या नायडू (२००२- २००४), नंतर उपराष्ट्रपती झाले. नितीन गडकरी (२००९-२०१३) पक्षाचे अध्यक्ष होते व केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री आहेत. अमितभाई शहा हे २०१४ ते २०२० पक्षाचे अध्यक्ष होते, केंद्रीय गृहमंत्री आहेत. जगत प्रसाद नड्डा हे पक्षाचे विद्यमान अध्यक्ष असून केंद्रीय आरोग्यमंत्री आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भाजपाचे सर्वात लोकप्रिय नेते आहेत. त्यांच्याएवढी उत्तुंग लोकप्रियता देशातील अन्य कोणा राजकीय नेत्याला लाभली नाही. गेल्या वर्षी ५४३ जागांसाठी झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर भाजपाप्रणित एनडीएच्या २९३ खासदारांनी समर्थन घेऊन नरेंद्र मोदी देशाचे सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले.

आंध्र प्रदेशमधील चंद्राबाबू नायडू यांचा तेलुगू देशम व बिहारमधील नितीश कुमार यांचा जनता दल युनायटेड या दोन प्रमुख पक्षांनी मोदी सरकारला पाठिंबा दिलेला आहे. देशभरातील भाजपाचे २४० व राज्यसभेत ९८ खासदार आहेत. देशभरातील विधानसभांमध्ये भाजपाचे १६५६ व विधान परिषदांमध्ये १६५ आमदार आहेत. देशभरात २५ कोटी सदस्य संख्या नोंदविण्याचे लक्ष्य भाजपाने ठरविले आहे.

■ ■ ■

# राज्यभरात रूग्णांची लूट




पुणे येथील दीनानाथ रुग्णालयाशी संबंधित तनिषा भिसे गरोदर माता मृत्यू प्रकरणानंतर खडबडून जागे झालेल्या पुणे महापालिकेने शहरातील सर्वच खासगी रुग्णालयांना नोटीस बजावून उपचारापूर्वी डिपॉझिट घेण्यास मनाई केली आहे. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णावर प्रथम उपचार करा त्यानंतर त्यांच्याकडे पैसे मागा, असे या नोटीसीत नमूद करण्यात आले आहे.

तथापि, असले प्रकार केवळ दीनानाथ मंगेशकर धर्मादाय रूग्णालयाशीच संबंधित नाहीत तर राज्यभरातील अनेक रूग्णालये रूग्णांच्या जिवीताशी खेळण्याचा आणि त्यांना लुटण्याचा प्रकार करीत आहेत.

तनिषा भिसे नामक गरोदर महिलेला दीनानाथ रुग्णालयात गंभीर स्थितीत प्रसूतीसाठी आणण्यात आले होते. पण रुग्णालय प्रशासनाने त्यांना 10 लाखांचे डिपॉझिट भरल्यानंतरच दाखल करून घेण्याची भूमिका घेतली होती. परिणामी, उपचारास विलंब झाल्यामुळे तनिषा यांचा मृत्यू झाला. तेव्हापासून दीनानाथ रुग्णालयावर टीकेची झोड उठली आहे. या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेने सर्वच खासगी रुग्णालयांना नोटीस बजावली आहे.

महापालिकेने आपल्या नोटीसीत सर्वच खासगी रुग्णालयांना रुग्णांकडून उपचारापूर्वी डिपॉझिट न घेण्यास बंदी घातली आहे. तातडीच्या उपचारांची गरज असलेल्या रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांकडून कोणतीही अनामत रक्कम घेतली जाऊ नये. सर्वप्रथम रुग्णावर उपचार करण्यास प्राधान्य दिले जावे, असे निर्देश मनपाने आपल्या तातडीच्या नोटीसीद्वारे दिलेत. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे इमर्जन्सी स्थितीत रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे, पुणे पोलिसांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रकरणात वैद्यकीय दुर्लक्षीपणा आढळला तर गुन्हा दाखल करण्याचे संकेत दिलेत. या प्रकरणी पोलिसांनी ससूनच्या अधीक्षकांना पत्र लिहून स्पष्टीकरण मागितले आहे. यासंबंधीच्या सरकारी अहवालात तनिषा भिसे यांना रुग्णालयात गंभीर स्थितीत तब्बल साडेपाच तास बसवून ठेवल्याची बाब समोर आली आहे. ही वैद्यकीय नेगलिजन्सची बाब आहे. यामुळे उपचारास विलंब झाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी या प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्रे आपल्या पत्रासोबत जोडल्याची माहिती आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे तनिषा भिसे यांच्या कुटुंबीयांकडे 10 लाख रुपयांच्या डिपॉझिटची मागणी करणाऱ्या डॉक्टर सुश्रुत घैसास यांनी सोमवारीच आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी आपल्या राजीनामा पत्रात दीनानाथ रुग्णालयाच्या नावलौकीकास गालबोट लागत असल्यामुळे राजीनामा देत असल्याचे नमूद केले आहे.

या रूग्णालयाशी संबंधित आणखी एक प्रकार म्हणजे सदर रूग्णालयाकरिता ज्या कुटुंबियांनी त्यांची 6 एकर जमीन दान दिली होती ती राजकीय दबाव टाकून मिळविण्यात आल्याचे पुढे येत आहे. सरकारी जमिनी लाटायच्या किंवा दबाव टाकून खाजगी जमिनी बळकवायच्या, त्यावर धर्मादाय रूग्णालये उभारायची, आयकर आणि अन्य बाबींमधून सूट मिळवायची आणि दुसरीकडे, रूग्णांची लूट करायची, असले धंदे अनेक रूग्णालयांकडून केले जात आहेत.

महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना अनेक रूग्णालयात आहे. येथे विविध आजाराच्या रूग्णांवर 1 रूपयाही न घेता मोफत उपचार करावयाचे असतात. परंतु, अनेक रूग्णालयात सर्रास लूट केली जाते. शासनाकडून लवकर पैसे येत नसल्याची सबब पुढे करीत रूग्णांकडून आधी वसुली केली जाते. औषध आणि भोजनाचे पैसे त्यांच्याकडून घेतले जातात. यातील काही रूग्णालये लोकप्रतिनिधींचे किंवा त्यांच्या नातेवाईकांच्या नावावर आहेत, हे उल्लेखनीय. नागपूर किंवा अन्य मोठ्या शहरातील खाजगी रूग्णालयांच्या डॉक्टरांना आता बाहेर कसाई असा शब्दप्रयोग होवू लागला आहे.

■ ■ ■

**वाचक लिहितात**

## सणसणीत चपराक?

बदलापूर प्रकरणातील अक्षय शिंदे बनावट एन्काऊंटर प्रकरणी उच्च न्यायालयाने राज्य सरकारला सणसणीत चपराक लगावली आहे. संबंधित पोलिसांवर गुन्हा दाखल करून त्यांना निलंबित करा, असे आदेश मुंबई हायकोर्टाने दिलेत. अक्षय शिंदे बनावट एन्काऊंटर प्रकरणी मुंबई हायकोर्टात सुनावणी झाली. या सुनावणीत मुंबई हायकोर्टाने आदेश जारी केले आहेत. अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरणातील ज्या पोलिसांवर आरोप होते, त्या पोलिस अधिकाऱ्यांवर मॅजिस्ट्रेट कोर्टाने एक अहवाल तयार केला होता. त्यात पोलिसांवर ठपका ठेवण्यात आला होता. या प्रकरणातील पाच पोलिस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहेत. न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि गोखले यांच्या खंडपीठाने हे आदेश जारी केले आहेत. मुंबई पोलिस सहआयुक्त गुन्हे यांना या प्रकरणी एसआयटी स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अक्षय शिंदेचे वडील अण्णा शिंदे यांनी पोलिसांवर कारवाईची मागणी करत याचिका दाखल केली होती.

आता नव्याने हे प्रकरण सुरू होणार आहे. मुळात विषय हा आहे की, अक्षय शिंदे याचे एन्काऊंटर करण्याचा निर्णय कुणी पोलीस अधिकाऱ्याने घेतला की त्यांना मुख्यमंत्री, गृहमंत्री यापैकी कुणी आदेश दिलेत? मंत्र्यांच्या आदेशाशिवाय वरिष्ठ पोलीस अधिकारी थेट एन्काऊंटर करण्याचे धाडस करू शकणार नाहीत.

ही घटना घडली तेंव्हा सत्ताधारी पक्षाच्या अनेक मंत्र्यांनी एन्काऊंटरचे समर्थन केले होते. आता संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश कोर्टाने दिल्याने पेच निर्माण झाला आहे. संबंधित पोलीस अधिकारी बचावासाठी आदेश देणाऱ्या मंत्र्यांचे नाव उघड करू शकतात.

■ समिर आकरे, नागपूर.

# कोणाला चावायचे याची निवड मच्छर कशी करतात?



उन्हाळ्याचे दिवस असून डासांचा उपद्रव याकाळात सर्वाधिक असतो. काही लोकांना मच्छर किंवा डास खुपच त्रास देतात. तर काही लोकांना कमी त्रास देत असतात. तुमच्या बाजूला बसलेल्या मित्राला डास चावत नाहीत आणि तुम्हाला मात्र डासांनी फोडून खाल्लेले असते.

असे नेमके का होते. काही लोकांना डास जास्तच चावतात. तर काही लोकांना कमी असे का असते? या मागे विज्ञान आहे. काही रक्त गटाच्या लोकांना जादा मच्छर चावतात तर काही रक्त गटाच्या लोकांना कमी चावतात असेही बरेचदा असते. डासांच्या चावण्यामागे शरीराचा गंध, रक्तगट, तापमान नेमके काय असते? काहींना डास कमी तर काहींना जास्त चावण्यामागचे नेमके कारण काय असते?

**कार्बनडाय ऑक्साईड आणि मच्छर**

मच्छर माणसांना शोधण्यासाठी कार्बन डायऑक्साईडची ($CO_2$) मदत घेत असतात. म्हणजे आपण जो उच्छवास सोडतो त्याचा ते अदमास घेत असतात. ज्या लोकांच्या शरीरातून कार्बनडाय ऑक्साईड जादा निघतो त्यांना किंवा मोठे उंचीने अधिक असलेल्यांना मच्छर अधिक निशाणा बनवित असतात.

**शरीराच्या तापमानाचा अदमास**


सुमारे 5 ते 15 मीटर अंतरावरुन डासांना माणसे दिसत असतात. माणसांच्या जवळ पोहचल्यानंतर ते आपल्या दृष्टीचा वापर करत असतात. ते जेव्हा आपल्या शरीराच्या एकदम जवळ पोहचतात. तेव्हा ते शरीराच्या तापमानाचा अदमास घेतात. त्यावेळी ते एखाद्या व्यक्तीला चावायचे की नाही याचा निर्णय घेत असतात.

आपल्या शरीरातून निघालेले गंध देखील मच्छरांना अधिक आकर्षित करीत असतो. घामात असलेल्या लॅक्टीक एसिड, युरिक एसिड आणि अमोनिया सारख्या रसायन मच्छरांना आवतण देत असतात. प्रत्येक माणसाचा शरीराचा गंध वेगवेगळा असतो. जी जिन्स आणि बॅक्टेरियावर अवलंबून असते. त्यामुळे ज्याच्या शरीरातून अधिक वास येतो त्याला सर्वाधिक डासांचा उपद्रव होतो. त्यालाच डास जास्त चावत असतात.

अनेक संशोधनात हे स्पष्ट झाले की O रक्त गटाच्या लोकांना मच्छर जास्त चावतात. तसेच A रक्त गटाच्या लोकांना मात्र मच्छर कमी पसंत करतात. मच्छर काही रक्त गटांत असलेल्या रासायनिक घटकांना आकर्षित होऊन त्या व्यक्तींना जास्त चावत असतात.

अधिक तापमान असलेल्या किंवा अधिक घाम येणाऱ्या व्यक्तींच्या शरीराकडे मच्छर कायम आकर्षित होत असतात. मच्छरांना त्यांना चावणे आवडते. म्हणून उन्हाळ्यात व्यायाम केल्यानंतर मच्छर त्यांना अधिक चावत असतात.घामातून नघणारा ओलावा थंडावा आणि वास मच्छरांना जवळ बोलावतो. परंतू हे अजून सिद्ध झालेले नाही तुम्हाला नेमके याच कारणांसाठी मच्छर चावतील,परंतू हे एक मोठे कारण जरुर आहे.

अशोकायन
प्रा. अशोक सारडा मेहकर
(९४२१३९४३३९)




## अहिंसा परमो धर्म!

'जगा व जगू द्या ' ची शिकवण
देती महावीर स्वामी
हिंसा करणे ही तर
पशुत्वाची निशाणी...!

काया वाचा मनसाही
घडूच नये चुकून हींसा
शाकाहार मानवी प्रकृती
मासांहार ही समजावी विकृती

अहं ठेवूनी बाजूला
करावी त्यांची क्षमायाचना
आपल्या कृतीने अजानता
झाली ज्यांच्या मनी यातना ..!








आज का अंदाज

गुरूवार १० मार्च २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| 1 | 4 | 5 | 8 |
|---|---|---|---|
| 155 | 789 | 799 | 279 |
| 588 | 446 | 122 | 468 |
| 290 | 347 | 500 | 350 |
| 19 | 49 | 57 | 87 |
| 12 | 42 | 56 | 86 |
| 10 | 40 | 53 | 83 |

मुंबई बाजार


| 4 | 7 | 8 | 9 |
|---|---|---|---|
| 257 | 250 | 134 | 270 |
| 112 | 368 | 350 | 469 |
| 356 | 133 | 567 | 199 |
| 40 | 70 | 86 | 96 |
| 41 | 71 | 83 | 93 |
| 42 | 72 | 85 | 95 |

१० एप्रिल २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 31 | 61 | 98 | 08 |
| 35 | 65 | 94 | 04 |
| 37 | 67 | 92 | 02 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


# शब्दकोडे क्रमांक २०८०




**आडवे शब्द :-**
१) आदर्श दांपत्य
७) संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
१०) खिडकी
११) बोकड एडका
१२) नमस्काराचा एक प्रकार
१३) रेशीमाचे जाडसर कापड
१५) हिंमत, धैर्य
१७) वेळ
१८) चिंतन
२०) पिता, निर्माता
२१) यज्ञ
२२) लोणी
२५) च्या बरोबर
२६) छिद्र, दोष, न्यून
२७) परमेश्वर
२९) नंतर
३१) काळी मैना
३४) आवाज
३६) शिक्षक
३७) पत्र
३९) दात
४०) संस्थेचे धोरण ठरविणारा व चालविणारा
४१) जतन, काळजी
४२) सोन्याचा पर्वत
४४) प्रतिष्ठा, अब्रू
४६) बशीचा जोडीदार
४७) विविध
४८) बाई
५०) हात
५१) टणक
५४) नारायणराव पेशव्यांचे अखेरचे उद्गार
५७) श्वसनेंद्रिय
५८) माल साठविण्याची जागा
५९) प्रहर
६१) पृष्ठभागावरील छोटा तुकडा
६३) चेतक घोड्याचा मालक असलेला राजा ** *** सिंग
६५) नाचणी धान्याचे एक नाव
६६) संन्यासाचे निवासस्थान
६७) कट्टर, मताशी ठाम असलेला
६८) कमळ
७०) उपासना, प्रार्थना, पूजा
७१) अभिप्राय, हेतू, अर्थ
७३) वांती
७५) राजा
७६) समशेर
७७) अंग रगडणे, चोळणे

**उभे शब्द :-**
१) कपाळ
२) सुंदर, शहाणा
३) पोपट
४) पुरुन ठेवले द्रव्य
५) चालविणारा
६) पादत्राण
७) पळून जाणे
८) ** दाम दंड भेद
९) नेत्र
१२) सारखा
१४) सखी, मैत्रीण
१६) मध
१७) ठाणवई
१८) ** माऊ–मांजर
१९) मान खाली घालणे विनम्र होणे
२०) गरळ, विष
२३) छाती
२४) सरसकट
२५) संपूर्ण
२८) बाण
३०) मगज
३२) नमस्कार
३३) ढग
३५) पाहिला ऋतू
३६) धनी
३८) घोडे बांधण्याची जागा
३९) रचना करणारा
४२) लाकडाचा वा दगडाचा पातळ तुकडा
४३) अक्षरापुढची उभी रेघ
४४) आत्म्याचा दुसऱ्या शरीरात प्रवेश
४५) अनुमती
४६) वैताग, बडबड
४८) चौक
४९) पुष्पगुच्छ
५०) केस
५२) हरभरा(हिं )
५३) त्वेष, आवेश
५५) माया, प्रेम
५६) बातमी
६०) वंदनाचा एक शब्द
६२) सिंह
६३) पोपट
६४) वाचेच्या चार अवस्थेतील पहिली, श्रेष्ठ भक्ती
६५) समुद्रातील तांबड्या रंगाचा मासा
६७) तंबू, नाटक यामधील कापडी भिंत
६९) आयुष्य, पाणी
७०) करवत
७१) अजगर
७२) मृत्युराजा
७४) व्यापारी फायदा

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# मी बांधलेल्या सी लिंकवर मलाही दोन वेळा दंड भरावा लागला

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितला किस्सा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
मुंबईतील प्रसिद्ध वांद्रे-वरळी सी लिंकचे काम मीच केले. या महामार्गावर मलाही एकदा नव्हे तर दोनदा दंड भरावा लागल्याचा किस्सा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितला आहे.

वांद्रे-वरळी सी लिंक मीच बांधला, पण त्याच सी लिंकवर मला दोनदा चलान बजावण्यात आले होते. चलानपासून कोणीच वाचू शकत नाही. कॅमरा सगळे काही टिपत असतो. तेव्हा मला 500 रुपयांचा दंड भरावा लागल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

नितीन गडकरी म्हणाले की, अपघात रोखण्यासाठी मानवी वर्तनात बदल करणे सर्वात महत्त्वाचे आहे. रस्ते अपघातातील बहुतेक मृत्यू हेल्मेट न घातल्यामुळे होतात. दंड भरावा लागल्याबद्दल लोकं बऱ्याच वेळा तक्रार करत असतात, कूरकूर करतात, पण कोणीच नियमांचे उल्लंघन करू नये. दंड हा महसूल निर्माण करण्यासाठी बजावला जात नाही.

नितीन गडकरी म्हणाले की, पेट्रोल आणि डिझेलशिवाय इतर कोणतीही गाडी खरेदी करा. फ्लेक्स इंजिन, इलेक्ट्रिक आणि हायड्रोजन कार हे भविष्य आहे. मी स्वतः हायड्रोजन कार खरेदी केली आहे.

रस्ते टोलमुक्त करण्याच्या धोरणावर काम सुरू आहे, ज्यामुळे टोल भरणाऱ्यांना दिलासा मिळेल. 8-10 दिवसांत त्याची घोषणा केली जाईल. सध्या मी तुम्हाला एवढेच सांगू शकतो की टोल 100% कमी केला जाईल.

### अपघाग्रस्तांना मदत करणाऱ्यांना २५ हजारांचे बक्षीस

नितीन गडकरी म्हणाले की, हल्ली स्पीड ब्रेकरमुळे स्लिप डिस्कची समस्या उद्भवू शकते आणि वेग तपासण्यासाठी एक नवीन रंग कोड येत आहे. जे कंत्राटदार त्यांचे काम योग्यरित्या करत नाहीत त्यांच्याशी ते कठोरपणे वागतो. जे कंत्राटदार त्यांचे काम योग्यरित्या करत नाही. तर अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्यांना राहवीर योजनेअंतर्गत आम्ही 25,000 रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. आम्ही हे देखील कव्हर करण्याचा विचार करत आहोत. जखमींच्या उपचाराचा खर्च आम्ही पंतप्रधानांकडे मागितला आहे.

# दोन महिन्यांच्या जुळ्या बाळांचा आईनेच केला खून

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ९ :
पुण्यातील लोणी काळभोर परिसरात दोन महिन्यांच्या जुळ्या बाळांची वाढ होत नसल्याने खचलेल्या आईने दोन्ही चिमुकल्यांना पाण्याच्या टाकीत बुडवून ठार मारले. या आईने देखील आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ही बाब कुटुंबीयांच्या लक्षात येताच त्यांनी तातडीने धाव घेत महिलेला वाचवले. दुर्दैवाने यात बाळांचा मात्र मृत्यू झाला आहे. या प्रकरणी 35 वर्षीय महिलेवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

संबंधित महिला सांगली जिल्ह्यातील आष्टा येथील मिरजवाडी येथील असून तिचा विवाह प्राथमिक शिक्षकाशी झाला होता. विवाहानंतर 10 वर्षे त्यांना अपत्य झाले नव्हते. त्यामुळे त्यांनी अखेर टेस्टट्यूब बेबीचा निर्णय घेतला.

मोठा खर्च करून दोन महिन्यांपूर्वी या दोघांना जुळी मुले झाली. ही महिला सध्या माहेरी म्हणजे दत्तनगर येथे राहत होती. मात्र बाळांची वाढ नीट होत नव्हती. त्यात तिची देखील प्रकृती खालावली. आर्थिक खर्च आणि वाढत्या तणावामुळे या महिलेने टोकाचे पाऊल उचलले. दोन्ही बाळांना मंगळवारी सकाळी घरच्या छतावर नेत पाण्याच्या टाकीत बुडवून त्यांना ठार केले. या नंतर उडी मारून स्वतः देखील आत्महत्येचा प्रयत्न केला.

आपल्या बाळांना मारून आत्महत्या करत असतानाच कुटुंबीयांच्या लक्षात आले व तातडीने धाव घेत महिलेला वाचवले. परंतु, बाळांना वाचवता आले नाही. या प्रकरणी महिलेच्या भावाने लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, संबंधित 35 वर्षीय महिलेवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, पुण्यातीलच दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे प्रकरण ताजे असतानाच या घटनेने सर्वांचे लक्ष वेधले आहे. दीनानाथ रुग्णालयात पैशांच्या अभावी गर्भवती महिलेवर उपचार न झाल्याने तिचा मृत्यू झाल्याचा आरोप रुग्णालयावर करण्यात आला आहे. या घटनेत तनिषा भिसे या महिलेचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी सध्या तपास सुरू असून रुग्णालयावर कारवाईचे देखील आदेश देण्यात आले आहेत.

## आर्थिक देवाणघेवाणीतून व्यावसायिक रमण चांडक यांची हत्या

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ९ :
पणज येथील व्यापारी रमण सीताराम चांडक यांची दगडावर डोके आदळून हत्या करण्यात आली. घटनेच्या एक दिवस आधीपासून ते बेपत्ता होते. दुसऱ्या दिवशी पोपटखेड शिवारातील दहिखेड फुटकर शिवारात त्यांचा मृतदेह आढळून आला.

अकोट ग्रामीण पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेऊन अटक केली आहे. आर्थिक देवाणघेवाणीतून हत्याकांड झाल्याचे प्राथमिक तपासावरून समोर आले आहे.

गजानन साहेबराव रेळे (५५), रा. वडाळी सटवाई, ता. अकोट असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पोपटखेड शिवारातील केलपाणी येथील बंद पडलेल्या मे. विदर्भ बोन मिलच्या अर्धवट बांधकाम असलेल्या ठिकाणी एक मृतदेह पडून असल्याची माहिती अकोट ग्रामीण पोलिसांना मिळाली. मृताची दगडाने मारून हत्या केल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्याने, हत्येच्या दिशेने पोलिसांनी तपासाला सुरूवात केली. मृताकडे असलेल्या ओळखीच्या पुराव्यावरून मृतदेह रमण सीताराम चांडक यांचा असल्याचे समोर आले.



रमण चांडक हे ऑटो डिलिंगचा व्यवसाय करायचे. त्यांचे मूळ गाव पणज असले तरी ते अकोल्यातील गीतानगर भागात राहात होते. चांडक हे ऑटो डिलिंग व्यावसायिक असल्याने काहींशी त्यांचा वाद असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी चौकशी सुरू केली असता वडाळी सटवाई येथील गजानन साहेबराव रेळे याचेवर पोलिसांना संशय आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

मृत रमण चांडक यांचा पुतण्याच्या तक्रारीवरून अकोट ग्रामीण पोलिस ठाण्यात कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस निरीक्षक किशोर जुनघरे करत आहेत.

रमण चांडक सोमवारी दुपारपासून तर उशिरा रात्रीपर्यंत घरी न आल्याने ते बेपत्ता झाल्याची तक्रार त्यांच्या पत्नी ज्योती चांडक यांनी ठाण्यात मध्यरात्री दिली होती. या तक्रारीवरुन पोलिस त्यांचा शोध सुरू करणार त्याच्या आधीच रमण चांडक यांचा मृतदेह पोपटखेड शिवारात आढळून आला.

## जैन मंदिरातील दानपेटी फोडली

**हिंगोली :** सेनगाव येथील जैन मंदिरातील दोन दानपेटीतील रकमेसह चार ठिकाणी चोरट्यांनी हातसाफ केला असून या प्रकरणी सेनगाव पोलिस ठाण्यात रात्री उशीरा गुन्हा दाखल झाला आहे.

वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. तर सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून चोरट्यांची ओळख पटविण्याचे काम सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# भूतानच्या तरुणीवर लैंगिक अत्याचार

## नऊ जणांवर गुन्हा दाखल

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ९ :
भूतान देशाची नागरिक असलेल्या 27 वर्षीय तरुणीवर पुण्यात लैंगिक अत्याचार झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पीडित तरुणीच्या आरोपांनुसार 9 जणांवर समर्थ पोलिस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये तरुणीवर वेगवेगळ्या ठिकाणी या मित्रांनी अतिप्रसंग केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

या प्रकरणाबाबत मिळालेल्या माहितीनुसार, भूतान देशाची नागरिक असलेली सत्तावीस वर्षीय तरुणी 2020 मध्ये पुण्यात वास्तव्याला आली होती. ती भारतात बोध गया येथे आली असताना शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने तिची ओळख आरोपी ऋषिकेश नवले सोबत झाली. तर ऋषिकेश यानेच या तरुणीची ओळख मित्र शंतनू कुकडे यांच्यासोबत करून दिली.

कुकडे हा एक संस्था चालवतो. कुकडे यानेच त्या मुलीला पुण्यात घर वास्तव्यास दिले. तसेच शिक्षणासाठी देखील आर्थिक मदत केली. त्यानंतर ओळखीचा फायदा घेत शंतनू कुकडे याने त्या मुली सोबत लैंगिक संबंध प्रस्थापित केले.

कालांतराने शंतनू कुकडे याच्या सोबत त्याचे मित्र देखील पीडित मुली सोबत लैंगिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी येऊ लागले. अनेकदा हे सर्वजण बाहेर देखील फिरायला जात होते. त्यावेळी या मित्रांनी वेगवेगळ्या ठिकाणी आणि वेगवेगळ्या वेळी तरुणी सोबत लैंगिक अत्याचार केले.

यामध्ये शंतनू कुकडे यांच्यासह इतर नऊ आरोपींचा समावेश आहे. यामध्ये पुण्यातील प्रसिद्ध वकील विपिन बिडकर यांचा देखील समावेश आहे. त्यांच्यासह शंतनू कुकडे, ऋषिकेश नवले, जालिंदर बडदे, उमेश शहाणे, प्रतीक शिंदे, सागर रासगे, अविनाश सूर्यवंशी, मुद्दासीन मेमन यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**आरोपी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा पदाधिकारी**

या प्रकरणातील आरोपी शंतनु कुकडे हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा पदाधिकारी असल्याचा दावा केला जात आहे. मात्र, त्याने आधीच पक्षाचा राजीनामा दिले असल्याचे पक्षाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. त्याच्या विरोधात समर्थ पोलिस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

याप्रकरणी धक्कादायक बाब म्हणजे पुण्यातील नामांकित वकील विपिन बीडकर यांना देखील पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. याबाबत पोलिस उपायुक्त संदीप सिंग गिल म्हणाले, शंतनु कुकडे प्रकरणाचा पोलिस तपास करत असताना, कुकडे याच्या फाउंडेशन मार्फत भूतानची एक तरुणी मागील अनेक वर्षापासून त्याच्या सोबत राहत होती.

सदर तरुणीची घरची परिस्थिती हलाखीची असल्याने ती कुकडे याच्या फाउंडेशनच्या माध्यमातून राहत असताना, कुकडे याच्या ओळखीतील अनेक जणांची ये-जा वेगवेगळ्या कारणाने, पार्टीकरिता सुरु असायची. यादरम्यान, एक वर्षापूर्वी विपिन बीडकर देखील सदर ठिकाणी येऊन त्यांनी तरुणी सोबत अतिप्रसंग केल्याची तक्रार तरुणीची आहे.

## शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आरसीएफचे मोफत शिबीर

**: लोकसेवार्थ :**



लोकजागर

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स हि खत आणि कीटकनाशकांच्या निर्मितीत अग्रेसर असलेली राष्ट्रीय स्तरावरील एक नामांकित कंपनी आहे. आरसीफ सारख्या कंपनीचा व्यवसाय जरी खत निर्मितीचा असला तरी हीच कंपनी संपूर्ण वर्षभर देशातील शेतकऱ्यांप्रती सामाजिक बांधिलकी जपत त्यांच्याप्रती कृतज्ञता म्हणून शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजण करते.

याच उपक्रमांचा भाग म्हणजे सध्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी आरसीएफच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपतच आरसीएफ ट्रेनिंग सेंटर सुरु करण्यात आले आहे. याच ट्रेनिंग सेंटर अंतर्गत शेतकऱ्यांना आपला कृषी विस्तार वाढविण्यासाठी मोफत मर्गदर्शन शिबिरांचे आयोजन देखील करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाच्या वतीने नुकतेच रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात असलेल्या परहूर येथे कृषी फलोत्पादन परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रीय केमिक्लस अँड फर्टिलायझर्स चे थळ येथील कार्यकारी संचालक नितीन हिरडे यांनी शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून आपली शेती आधुनिक कशी करता येईल? आणि त्यासाठीच आरसीएफ शेतकऱ्यांना कशी मदत करेल? या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले.

या परिषदेचे अध्यक्ष चंद्रकांत मोकळं यांन आपल्या मार्गदर्शनपर भाषणात ,'वातावरणातील बदलामुळे ऐन हंगामात अवकाळी पावसामुळे आणि अति प्रचंड तापमानामुळे आंबा आणि सर्व प्रकारच्या उत्पादनात जवळपास ७० टक्क्यावरून ३० टक्के इतकी घट झाल्याने फालोत्पादक शेतकरी कसा अडचणीत आला आहे आणि त्यांच्या मदतीसाठीच आरसीफच्या वतीने कृषी विद्यापीठ आणि आयसीआरच्या वतीने पाठपुरावा सुरु असल्याचे' देखील मोकळं यांनी सांगितले.

या परिषदेत रायगड जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी पावन कुमार नझुन,आरसीएफचे जनसंपर्क अधिकारी डॉ. राकेश कवले, कोकण कृषी विद्यापीठ अंतर्गत कर्जत कृषी संशोधन केंद्राचे सहयोगी संचालक आणि कृषी शास्त्रज्ञ डॉ. एल. एस. चव्हाण,कर्जत कृषी संशोधन केंद्राच्या फलोत्पादन शास्त्रज्ञ प्रा. वैशाली सामंत आदींनी हवामान बदल, मसाले पीक, निर्यातक्षम फलोत्पादन, मातीचे आरोग्य, या विषयावर मार्गदर्शन केले.

आरसीएफच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी महारष्ट्रातील जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये सातत्याने प्रत्यक्ष शेतीवर जाऊन कार्यशाळा घेतल्या जातात आणि अगदी माती परीक्षणापासून ते मातीचा पोत, पोषकता आणि पीक तसेच लागणारी खत आणि कीटकनाशक या संदर्भात देखील प्रात्यशिकासह मार्गदर्शन केले जाते. शेतकऱ्यांना आधुनिक शेती आणि तंत्राचा मूलमंत्र देत आरसीएफ सारख्या सरकारी संस्थेचे हे उपक्रम म्हणजे शेतकऱ्यांना संकटाच्या काळात आधारच आहेत. ■ ■ ■

## टुटॉर्त अकेडेमीची यशोगाथा

**: शून्यातून विश्व :**



शिक्षण घेतल्यावर अनेकांचे मोठी नोकरी मिळवण्याचं स्वप्न असतं. पण काहीजण चांगली मिळालेली नोकरी सोडून पुन्हा व्यवसायाकडे वळत आहेत. आज आपण अशाच एका तरुणाची यशोगाथा पाहणार आहोत, ज्याने संघषार्तून स्वतःचं एक वेगळं विश्व निर्माण केलं आहे. मनू अग्रवाल असं या तरुण उद्योजकाचं नाव आहे. मनू अग्रवालने 2 कोटी रुपयांची नोकरी सोडून Tutort Academy ऑनलाइन प्लॅटफॉर्म सुरु केलाय.

मनू अग्रवालने गुगल आणि मायक्रोसॉफ्टसारख्या कंपन्यामध्ये नोकरी केली आहे. सुरुवातीच्या काळात अग्रवालला अनेक कपन्यांनी नोकऱ्या देण्यास नकार दिला होता. मात्र, नंतरच्या काळात त्यांनी अनेक चांगल्या कंपन्यामध्ये काम केलं. मनू अग्रवालला मायक्रोसॉफ्टमध्ये सुमारे 2 कोटी रुपयांचे पॅकेज मिळाले होते. पण, त्याने ही सोडून आपले स्टार्टअप Tutort सुरु करण्याचा निर्णय घेतला. मनू अग्रवाल यांचा मोठा संघर्ष आहे. मोठ्या संघर्षातून त्यांनी हे यश मिळवलं आहे. मनू अग्रवाल हे मुळचे उत्तर प्रदेशातील झाशी या छोट्याश्या गावचे रहिवाशी होते. त्यांनी सुरुवातीचं त्याचं शिक्षण सरकारी शाळेत पूर्ण केलं. त्यानंतर बुंदेलखंड विद्यापीठातून त्यांनी बॅचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्सचं शिक्षण पूर्ण केलं. त्यानंतर त्यांनी नोकरी शोधायला सुरुवात केली मात्र, त्यांना काही नोकरी मिळाली नाही.

अनेक कंपन्यांनी नकार दिला. काही कालावधी गेल्यानंतर त्यांना विप्रोमध्ये 10 हजार रुपयांची नोकरी मिळाली. नोकरी लागल्यानंतर मनू यांनी पुढच शिक्षण घेतलं. त्यांनी तिरुचिरापल्ली येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथून मास्टर्स इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (एमसीए) पदवी घेतली. 2016 मध्ये मनू अग्रवाल यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी घटना घडली. त्यांना मायक्रोसॉफ्ट या बड्या कंपनीत त्यांना इंटर्नशिप मिळाली. इंटर्नशिप पूर्ण झाल्यानंतर त्यांना मायक्रोसॉफ्टने सिएटल, वॉशिंग्टनमध्ये नोकरी दिली. सुरुवातीला मनूला 1.9 कोटी रुपयांचे पॅकेज मिळाले.

त्यानंतर मनूने 2021 मध्ये नोकरी सोडून मित्र अभिषेक गुप्तासोबत स्टार्टअप सुरु केले. आणि आज हाच मनु अग्रवाल ओनलाईन स्टार्टअप द्वारे आज कोट्याधीश बनलेला आहे. त्याची हि ओन्लाईन कंपनी आज जगभरातील नामांकित कंपन्या पैकी एक म्हणून नावाजली जात आहे.

■ ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# गर्जनेचा शंख अन् बंडाचा डंख!

प्रज्ञा साहित्य संघ, महाराष्ट्र, शाखा वाशिम यांच्यावतिने वाशिम येथील पत्रकार भवनात गुरूवार १० एप्रिल रोजी चौथे एकदिवसीय भव्य कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून दादासाहेब जगतपुरिया लाभले असून, अनेक नामवंत साहित्यिक उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमानिमित्त डी. बी. जगतपुरिया यांचे अध्यक्षीय भाषण प्रकाशित करीत आहोत.

-------------

राज्यस्तरीय आंबेडकरी कवी संमेलनाचे संयोजक, उद्घाटक विमलताई वाघमारे, स्वागताध्यक्ष सौ. कल्पना कैलास राऊत, मावळते अध्यक्ष कविवर्य प्रशांत वंजारे, प्रज्ञा साहित्य संघाचे आयु. शालिक वानखेडे, मा. ग. ना. कांबळे व या ऊर्जावान महोत्सवात सहभागी होणारे तमाम प्रज्ञावंत कवी-कवयित्री ज्यांना मी बुद्धीवर विश्वास ठेवणारे जगातले क्रांतीकारी शास्त्रज्ञ मानतो, ते तथागत महात्मा गौतम बुद्ध, महात्मा ज्योतिबा फुले, सूर्यकुलातल्या तमाम प्रज्ञावंत, कवी, कवयित्री, समीक्षक, विचारवंत घडवणारे महाप्रज्ञावंत, युगनायक बाबासाहेब यांच्यासह तमाम महापुरुषांना मी अभिवादन करतो. मित्रांनो, वाशिमच्या भूमीने अनेक ऊर्जावान कवी, लेखक, पत्रकार, काव्याग्रह धरणारे संपादक, कथाकार घडवले आहेत. या सत्वशील भूमीला मी अभिवादन करतो. प्रज्ञा साहित्य संघाने उद्घाटन सत्रात अध्यक्षपद देऊन मला सन्मानित केले. त्यांच्या सर्व सदस्यांचे मी सादर आभार मानतो.

माझ्या तेजस्वी, ओजस्वी मित्रांनो, कॉम्प्यूटर, विज्ञान, तंत्रज्ञानाच्या काळात साहित्याने वैज्ञानिक दृष्टिकोन जपत समाजाला अंधारातून प्रकाशाकडे जाणारा राजमार्ग दाखवला पाहिजे! तो कलावादी, चंगळवादी लेखक दाखवणार नाहीत. आपल्या साहित्याने तर कलावादी साहित्याचा पोकळपणा सिद्ध केला. हे काम आम्ही सूर्यकुलातील लेखकांनाच करावे लागणार आहे! आचारक्रांतीचे जनक प्रबोधनकार ठाकरे म्हणाले होते...

*धर्मावाचुनि प्राण न जाई*
*देवाविन नच, अडते,*
*आत्मशक्ती खंबीर तयांच्या*
*त्रिभुवन पाया पडते!*

लोकहितवादींनी शास्त्र-पुराण बाजूला सारुन बुद्धी चालवायचा महामंत्र दिला. कविता तर जडतेला तोडणारा सृजनात्मक प्रयत्न असते. कविता मनाची मशागत करते. मन शुद्ध करते. कविता कसं जगावं, वागावं हेही शिकवते. कविता केवळ मिरवायची वस्तू नसून ती मनात मुरवायची, जिरवायची बाब असते.

बाबासाहेबांच्या तेजस्वी विचाराचं सत्त्व पचवलेली आंबेडकरी कविता माणसाला नीतिवान, गतिवान, ऊर्जावान आणि प्रज्ञावान बनवते. ती दंभ ढोंगाला चिरडून टाकते. तुच्छतावाद्यांना सुरुंग लावते. विकृतीवर प्रहार करते. मांगल्याची, समतेची आराधना करते.

*झुंजार लेखणीला हरणे कबूल नाही,*
*झुंजार लेखणीला झुरणे कबुल नाही!*
*सुर्यकुल (पृ.70)*

असा क्रांतिकारी संदेश जागवत ही कविता अभिव्यक्त होते.

*कविता...*
*दर्पणाचा पारा*
*खळाळती धारा*
*चैतन्याचा वारा असते!*
*कविता...*
*ममतेचा पंख*
*गर्जनेचा शंख*
*बंडाचा डंख असते!! ठिणगी (पृ.3)*

हा तिचा जाहीरनामा, वचननामा, हुकुमनामा असतो. परिवर्तनवादी कवी-

*ही अक्षरेच आता*
*सारे इमान माझे*
*ही अक्षरेच आता*
*सारे प्रमाण माझे!*

असे ब्रीद बाळगून कविता लिहीत असतो.

मित्रांनो,
एपिक्यूरस नावाच्या विदेशी विचारवंतांने परमेश्वर, परलोक, स्वर्ग या गुंत्यात अडकून वेळ घालवू नये असे ठणकाऊन सांगितले. रोमन भाषेची नोबेल विजेती लेखिका हर्टा म्यूलर म्हणते, जीवन विद्रोहाने भरलेली यात्रा आहे. जो ताणतणांवावर मात करून नेहमी संघर्ष करतो तो धाडसी, मुत्सद्दी माणूस असतो. संस्कारक्षम साहित्य जीवनाला तेज-चमक प्रदान करते. थोर निरक्षर विज्ञानवादी संत गाडगे बाबांनी परमेश्वराच्या नावावर खपणाऱ्या अवडंबराला आरोपाच्या कस्टडीत बंदिस्त केले. जे त्यांना कळले ते आपल्याला का कळत नाही?

चिंतक मित्रांनो, मी यापूर्वीही फुले, आंबेडकरी साहित्य संमेलनात आणि अस्मितादर्श साहित्य संमेलनात या भूमीत सन्मानित झालोय. त्यामुळे कविवर्य मोहन शिरसाट, शेषराव धांडे, दीपक ढोले, बाबाराव मुसळे, महेन्द्र ताजणे इ. अनेकांशी जुळलेलं वैचारिक अक्षय नातं अभंग आहे. या नात्यात प्रा. मधुकर बनसोड, कवयित्री मधुराणी बनसोड, असे अनेक प्रतिभावंत आहेत. मोहन शिरसाट यांनी तर सांस्कृतिक जिल्ह्याचा इतिहास लिहिला.

डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. श्रीपाल सबनीस, प्रा. केशव मेश्राम, डॉ. योगेन्द्र मेश्राम, बाबुरावजी बागूल, दया पवार, डॉ. निर्मलकुमार फडकुले, डॉ. सदा कऱ्हाडे, डॉ. भालचन्द्र फडके, डॉ. शैलेन्द्र लेंडे, नामदेव ढसाळ, कृष्णा किरवले, राजा ढाले, प्रा. डॉ. कुमुद पावडे, अरुण कांबळे, प्रा. अविनाश डोळस, डॉ. युवराज सोनटक्के, डॉ. महेन्द्र भवरे, ज. वि. पवार इ. अनेकांनी आपले योगदान देऊन आंबेडकरी साहित्याला शिखरावर नेऊन नवे परिमाण दिले !

नियतीवाद्यांचे, निराशावाद्यांचे, विकृतीवाद्यांचे साहित्य साहित्य नसते, मनुष्य हाच साहित्याचा आद्य, मध्य व अंतिम बिंदू असतो. लेखक कवीला काळाच्या कपाळावर आपल्या अक्षर क्रांतीची भक्कम मुद्रा कोरता आली पाहिजे.

वाशीम जिल्ह्याचे पूर्वीचे नाव वसगुल्म होते. वाशीम शहर राजा वाकाटक राज्याची राजधानी होती. धोंडूजा, इंगोले, अनिल कांबळे, डॉ. सुनिल अवचार, ग.ना. कांबळे, शालीक वानखेडे असे असंख्य कवी या जिल्ह्यात लिहिते आहेत. पहाट वारा, समता शाही, भीम किल्ला, सम्राट टाईम्स, दैनिक भारत, भारत संग्राम, महासागर ही सामान्य जनतेशी एकरुप झालेली वर्तमान पत्रे हीच जनतेची मुखपत्रे असतात.

दोस्तहो, संतोष वानखेडे नावाच्या या कलंदर, जिंदादिल माणसाने हा शब्दोत्सव आयोजित करण्यास पुढाकार घेतला. रिक्षा चालवून अक्षरांची आराधना करणाऱ्या या कलदार कार्यकर्त्यास मी अभिवादन करतो.

दोस्तांनो,
परिवर्तनाची लढाई खूप कठीण असते. ह्यह्यक्रांतीचं चक्र आम्हीच आमच्यासह फिरवू! या बाबासाहेबांच्या शब्दांत खोल अर्थ दडलाय. आम्ही म्हणजे पीडित- दुर्लक्षित, तिरस्कृत, कोट्यावधी गरीब, दुबळे, श्रमिक, कष्टकरी. यासाठी गुलछबू लेखक अडथळे आणतील. यासाठी आपल्यालाच नवरचनेच्या अवकाशात गरुडझेप घ्यावी लागेल.

भ्रांतीचं विसर्जन करून क्रांतीच्या पथाने जावं लागेल. विसाव्या शतकात पुरातनवादी-जीर्ण-टाकाऊ विचार खिळखिळे झाले. इष्ट असेल ते बोलणारच! हा बाणा अंगात भिनवावा लागेल. समविचारी साहित्य प्रवाहातल्या मित्रांना सोबत घ्यावं लागेल. समता, न्याय, ज्ञाननिष्ठा ही मूल्ये पेरण्यासाठी लेखण्या सज्ज कराव्या लागतील.

मित्रांनो, आपले ऊर्जावान हात एकमेकांच्या हातांत असू द्या. तुम्ही शत्रू नाहीत, समतेच्या जगातले मानवतेचे शिलेदार आहात हे दिसू द्या. आपल्या या प्रज्ञापथाला कडकडून विरोध करणाऱ्या संकुचित-संकीर्ण, मुंगीच्या मनाच्या धेंडांना त्यांच्या डबक्यात स्वस्थ बसू द्या! मित्रांनो, मी माणसाचं मूल्य जपणारा छोटा पण सच्चा माणूस आहे. मी आपल्याकडूनच भरपूर ऊर्जा ग्रहण केली आहे.

आपल्या या मौलीक संपर्कातले मोतीमोलाचे क्षण मी कधीच विसरणार नाही. एक कविता आपल्या दरबारात ठेऊन मी वाणीला विराम देणार आहे. साहित्यातच हे राष्ट्र जिवंत ठेवायची शक्ती आहे. साहित्यामुळेच नवा बलाढ्य भारत घडणार आहे! सत्याचा प्रकाश प्रक्षेपित करणारी ऊर्जावान लेखणीच अनाचार, दुराचार, व्यभिचार, कामाचार यांचा निःपात करीत डॉ. कलाम यांच्या स्वप्नातला बलाढ्य भारत घडवणार आहे!! सत्वशील विचारांच्या गर्भातून नवी समतामय पहाट उगवणार आहे !! कविता अशी आहे....

*कविता*
*कविता काळजातून कागदावर येतांना*
*कवी असतो मुक्यांचा ओठ*
*अन्याय उद्धवस्त करणारा*
*वादळी विस्फोट !*

*कविता*
*यातनांची मोळी असते*
*करुणेची झोळी असते.*
*अन्याय भेदणारी गोळी असते!*

*कविता*
*कवीचे युद्धात लढायचे शस्त्र असते.*
*अन्यायाच्या निःपाताचे अस्त्र असते*
*चारित्र्याचे निर्मळ वस्त्र असते!*
*कविता*
*निनादणारा गर्जनेचा शंख असते.*
*उब देणारा मायेचा पंख असते*
*कौर्य चिरडणारा विद्रोहाचा डंख असते!*
*कविता : असते मानवतेची मधाळ बोली*
*कविता : असते संयमाची लोभस डोली*
*आणि कविता : असते विकृतीला खाक करणारी होळी !*

*कविता*
*अंधांची आधार देणारी काठी असते*
*अपंगांना साथ देणारी लाठी असते*
*समुद्र एकवटणारी सृजनाची वाटी असते!*
*ज्यांचं जागत कुणीच नसतं त्यांच्यासाठी*
*कविता असते...*

*म्हणून वर्तमान, भूतकाळ व्यापणारी कविता*
*भविष्यातही अवश्य दिसते!*
*खरं म्हणजे कविता कवीचा महाग्रंथ असतो*
*म्हणूनच कवी विद्रोही असला तरी तो*
*मानवतेचा करुणाघन संत असतो !*

या महोत्सवात सहभागी होणारे सर्व प्रतिभावंत माझे गणगोत आहेत. ही संख्या गुणित पटीने वाढेल. या सर्वांचे मी अभिनंदन करतो. मित्रहो, माझं संबोधन आपण ऐकूण घेतलं. आपल्याशी सुसंवाद साधण्याची जी संधी उपलब्ध करून दिली. जय क्रांती ! जय भीम !! जय भारत !!!

**डी.बी. जगत्पुरिया**
**9860485398**